## ज्योतिषविषयक

सुप्रसिद्ध राज ज्योतिष श्री अंबाजी उपासक प. बाबुभाई शास्त्री जन्मतारीख पाहुन हस्तरेषा, नोकरी, व्यापार, विवाह, संतान, गृहक्लेश, प्रेमवंश, कोर्ट, विजय, वास्तुशास्त्र, शास्त्र, धनलाभ, दारू व्यसन, मनोकामना पुर्ण होण्याची 101% गॅरंटी

**तपस्वी हॉटेल बेसमेंट, 9 इंदिरानगर जॉगिंग ट्रॅकजवळ, मुंबई - आग्रारोड, नाशिक संपर्क : ९८२२८१७९०४**



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com



DIRECT ADMISSION

MBBS | MD | MS | BDS | MDS

BAMS | BUMS | BHMS

PANCHAKARMA

DERMATOLOGY | NURSING

PHARMACY

PHYSIOTHERAPY

PARAMEDICAL | VETERINARY

OPHTHALMOLOGY | FMGE

Indo Abroad Education

9326134770



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक १४९ वा | सोमवार, दि. १२ जानेवारी २०२६ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# आ. देवेंद्र कोठेंना अमोल शिंदेंचे ओपन चॅलेंज

## ‘सगळ्या तालमी आमच्यासाठी खमक्या; आता तू फक्त तुझी काळजी कर..’ - अमोल शिंदे




## लोकांच्या डोळ्यात पाणी आहे, पण नळाला पाणी नाही

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** सोलापूर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेस आणि भारतीय जनता पक्ष यांच्यातील राजकीय संघर्ष तीव्र झाला असून, निवडणुकीला अवघे चार दिवस उरलेले असतानाच महायुतीमधील घटक पक्षांतील नेत्यांमध्ये शाब्दिक युद्ध रंगले आहे. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अमोल शिंदे यांनी भाजपचे शहर मध्यचे आमदार देवेंद्र कोठे यांना जाहीरपणे ओपन चॅलेंज दिल्याने राजकीय वातावरण तापले आहे.

‘यापुढच्या काळात तुझी आणि माझी गाठ सोलापूर शहर मध्य मतदारसंघात १०० टक्के आहे. आता तू फक्त तुझी काळजी कर,’ असे थेट आव्हान अमोल शिंदे यांनी आमदार कोठे यांना दिले.

अमोल शिंदे म्हणाले की, सोलापूरकरांनी यापूर्वी काँग्रेसची सत्ता पाहिली आणि गेली नऊ वर्षे भाजपची सत्ता अनुभवली. मात्र, आजही शहरातील नागरिकांना नियमित पाणी मिळालेले नाही. ‘लोकांच्या डोळ्यात पाणी आहे, पण नळाला पाणी नाही, हीच सोलापूरकरांची अवस्था आहे,’ अशी टीका त्यांनी भाजपवर केली. याच पार्श्वभूमीवर शिवसेना-राष्ट्रवादीच्या उमेदवारांना मतदारांचा प्रचंड प्रतिसाद मिळत असल्याचा दावा त्यांनी केला.

महापालिकेच्या लढाईत भाजपचा निष्ठावंत कार्यकर्ता कुठेच दिसत नसल्याचा आरोप करताना शिंदे म्हणाले, ‘भाजपने त्यांच्या निष्ठावंत उमेदवारांची तिकीटे आधीच कापली. उपऱ्यांना पक्षात आणून आमच्यासमोर उभे करण्याचा प्रयत्न शहर मध्यचे आमदार देवेंद्र कोठे करत आहेत.’ मागील महापालिका निवडणुकीत शहर मध्यचे विद्यमान आमदार आमच्याच जीवावर या प्रभागातून निवडून आले होते, असा दावाही त्यांनी केला.

शिंदे म्हणाले की, ‘आमदार कोठे यांच्या नावाची या प्रभागात अवघी अकरा मते आहेत. तरीही मुस्लिम, मराठा, धनगर अशा सर्व समाजांनी त्यांना मागील निवडणुकीत डोक्यावर घेतले आणि निवडून आणले. म्हणूनच ते आज आमदार झाले. आता मात्र ते प्रभाग क्रमांक सातमध्ये मीच उमेदवार असल्याचे सांगत आहेत.’

‘प्रभाग सातमधील खरी लढाई ही आमदार देवेंद्र कोठे आणि अमोल शिंदे यांच्यातच होणार आहे,‘ असे सांगत शिंदे यांनी पुन्हा एकदा ओपन चॅलेंज दिले. ‘तुमची जेवढी ताकद आहे, तेवढी लावा. मी माझ्यासोबत असलेल्या मायमावल्या, वडीलधारी मंडळी आणि कार्यकर्त्यांची ताकद लावतो,’ असे त्यांनी ठणकावून सांगितले.

गेल्या चार दिवसांपासून शिवसेना-राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना पोलिस ठाण्यात बोलावून त्रास दिला जात असल्याचा आरोपही शिंदे यांनी केला. ‘विविध शासकीय यंत्रणांमध्ये काम करणाऱ्या आमच्या लोकांना धमक्या दिल्या जात आहेत. ‘तुझ्या भावाची बदली करीन, तुझ्या माणसाला सस्पेंड करीन’ अशा धमक्या दिल्या जात आहेत. हा लोकशाही प्रक्रियेचा अपमान आहे,’ असे ते म्हणाले.

शहर मध्यच्या आमदाराच्या हस्तक्षेपामुळे भाजपचेच नुकसान झाले असून लोकशाही पद्धतीने चालणाऱ्या निवडणुका वेठीस धरण्याचे काम सुरू असल्याचा आरोप शिंदे यांनी केला. ‘प्रभाग सातमधील जनता हुशार आहे. कोण लोकांसाठी रस्त्यावर उतरतो आणि कोण भांडण लावून राजकारण करतो, हे जनतेला चांगलेच माहिती आहे,’ असे त्यांनी स्पष्ट केले.

### ‘आता गाठ शहर मध्य मतदारसंघात’

‘प्रभाग सातमधून आम्ही निवडून येणारच. पण यापुढच्या काळात तुमची आणि माझी गाठ सोलापूर शहर मध्य मतदारसंघात आहे, हे १०० टक्के निश्चित आहे. आमच्या सर्व तालमी आमच्यासाठी खमक्या आहेत. आता फक्त तुझी काळजी कर,’ असा इशारा देत अमोल शिंदे यांनी आपले भाषण संपवले.



# राष्ट्रवादी-शिवसेना युतीची भव्य पदयात्रांने भाजप उमेदवारांत धडकी




## ‘सेवा, शिक्षण आणि संवेदनशीलतेच्या जोरावर प्रभागाचा विकास साधणार’ सी. ए. सुशील बंदपट्टे यांचा मतदारांशी थेट संवाद

## ‘कामाचा माणूस, आपला माणूस’च्या घोषणांनी प्रभाग ४ दणाणला

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** सोलापूर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक ४ मधून शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीचे अधिकृत उमेदवार सी. ए. सुशील बंदपट्टे यांनी मतदारांशी थेट संवाद साधत आपली विकासात्मक व सामाजिक भूमिका ठामपणे मांडली. सेवा, शिक्षण आणि संवेदनशीलतेच्या जोरावर प्रभागाचा सर्वांगीण विकास साधण्याचा निर्धार त्यांनी यावेळी व्यक्त केला.

प्रभाग क्रमांक ४ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना युतीच्या उमेदवारांनी काढलेल्या भव्य पदयात्रेमुळे संपूर्ण मतदारसंघात राजकीय खळबळ उडाली आहे. या पदयात्रेतील प्रचंड लोकसहभाग आणि शिस्तबद्ध शक्तिप्रदर्शन पाहून भाजपच्या उमेदवारांमध्ये धडकी भरल्याची चर्चा मतदारसंघात रंगली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना युतीचे अधिकृत उमेदवार कविता आनंद चंदनशिवे, सी. ए. सुशील चंदू बंदपट्टे, सारिका विवेक फुटाणे व विश्वनाथ दत्तात्रय बिडवे यांच्या नेतृत्वाखाली ही भव्य पदयात्रा काढण्यात आली. त्यावेळी ठिकठिकाणी मतदारांनी औक्षण करून स्वगत केले.

ही पदयात्रा बाळीवेस बुधले गल्ली, तुळजापूर वेस, मंगळवार पेठ पोलीस चौक, भुसार गल्ली, कुंभार वेस, क्षत्रिय गल्ली, कौतंम चौक, मधला मारुती, टिळक चौक, कस्तुरबा मार्केट, बारामीर चौक, शिवगंगा मंदिर, डिके ऑफिस, बाळीवेस चौक, महमाने चाळ, लाडका गणपती, जम्मा वस्ती, भिमाई चौक, हनुमान नगर, खोलवा रस्ता, बॉबी चौक, श्राविका शाळा, दमानी शाळा, स्वीपर कॉलनी, वडार गल्ली, लक्ष्मण महाराज पुतळा आदी मार्गावरून मार्गक्रमण करत आनंद दादा चंदनशिवे यांच्या कार्यालयाजवळ सांगता झाली.

पदयात्रेदरम्यान ‘कामाचा माणूस, आपला माणूस’ या घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला. प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी सुशिक्षित, संवेदनशील आणि संविधाननिष्ठ नेतृत्वाची गरज असल्याचे मत युतीच्या उमेदवारांनी व्यक्त केले.

या पदयात्रेत युतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, युवक-युवती, महिला तसेच विविध समाजघटकांतील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या शक्तिप्रदर्शनामुळे प्रभाग क्रमांक ४ मध्ये राष्ट्रवादी-शिवसेना युतीच्या प्रचाराला नवी ऊर्जा मिळाल्याचे स्पष्टपणे दिसून आले आहे.

### सेवा आणि माणुसकीचा वसा जपणारे नेतृत्व : विश्वनाथ दत्तात्रय बिडवे

सोलापूर महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक ४ मधून उमेदवारी करणारे विश्वनाथ दत्तात्रय बिडवे हे सुशिक्षित, सुसंस्कृत आणि समाजाभिमुख व्यक्तिमत्व म्हणून नागरिकांमध्ये ओळखले जातात. बी.कॉम. पदवीधर असलेले बिडवे गेल्या अनेक वर्षांपासून मार्केटिंग क्षेत्रात यशस्वीपणे कार्यरत असून, मागील २५ वर्षांपासून सामाजिक व धार्मिक कार्यात सक्रिय सहभाग घेत आहेत.

सोलापूर जिल्ह्यातील प्रसिद्ध डुल्या गणपती मंडळाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी गरजू नागरिकांना मदत, सामाजिक उपक्रम, धार्मिक सण सामाजिक बांधिलकीने साजरे करणे आणि युवकांना सकारात्मक दिशेने प्रवृत्त करणे अशा अनेक उल्लेखनीय उपक्रमांचे नेतृत्व केले आहे. लोकांच्या अडी-अडचणीला धावून जाणे, मदत मागणाऱ्यांकडे कोण आहेस यापेक्षा काय अडचण आहे हे विचारणे हीच त्यांची खरी ओळख आहे.

विश्वनाथ बिडवे यांची मोठी ताकद म्हणजे समाजातील प्रत्येक घटकाशी जोडलेला निःस्वार्थ मित्रपरिवार. राजकारणापलीकडे जाऊन माणुसकीची नाती जपणारे बिडवे मित्रांसाठी उभे राहतात आणि मित्रही त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असतात. राजकारण हे सत्तेसाठी नव्हे, तर सेवा करण्याचे माध्यम आहे, या भूमिकेतून ते प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याचे त्यांनी मतदारांशी संवाद साधताना सांगितले.

‘शब्द नव्हे काम करणारा, आश्वासन नव्हे प्रत्यक्ष मदत करणारा’ असे नेतृत्व प्रभाग क्रमांक ४ साठी आवश्यक असल्याचे नागरिकांकडून बोलले जात आहे.








सी. ए. सुशील बंदपट्टे यांनी अवघ्या २१ व्या वर्षी देशातील अत्यंत कठीण मानली जाणारी चार्टर्ड अकाउंटंटची परीक्षा उत्तीर्ण करून आपल्या कर्तृत्वाची सुरुवात केली. गेल्या वीस वर्षांत त्यांनी व्यावसायिक क्षेत्रात प्रामाणिकपणा, निष्ठा आणि कष्टाच्या जोरावर उल्लेखनीय यश संपादन केले असून, त्याचबरोबर सामाजिक बांधिलकी जपत सातत्याने सेवाभावी कार्य केले आहे.

सोलापूरमधील बाळीवेस, यल्लेश्वरवाडी येथे वडार समाजाच्या श्री अय्या गणपतीच्या २१ फूट उंच भव्य मूर्ती व मंदिर उभारणीचे कार्य बंदपट्टे कुटुंबाने केले असून, त्यातून सामाजिक एकोपा आणि धार्मिक सलोखा अधोरेखित झाला आहे. कोरोना महामारीच्या काळात समाज अडचणीत असताना चंद्रनील सामाजिक संस्थेच्या माध्यमातून हजारो गरजू नागरिकांना मोफत धान्य, जीवनावश्यक वस्तू आणि जनता भोजनाचे डबे वितरित करण्यात आले. त्या संकटसमयी बंदपट्टे कुटुंब अनेक कुटुंबांसाठी आधारवड ठरले.

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी माध्यम असल्याच्या भूमिकेतून दरवर्षी प्रभागातील गरीब व मध्यमवर्गीय कुटुंबांतील सुमारे तीन हजार विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्य देण्याचा उपक्रम ते सातत्याने राबवत आहेत. याशिवाय निराधार महिलांच्या मुलींच्या विवाहासाठी आर्थिक मदत करून अनेक कुटुंबांना त्यांनी आधार दिला आहे. कोणताही गाजावाजा न करता निस्वार्थ भावनेने काम करणे हीच बंदपट्टे कुटुंबाची ओळख असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

OBC प्रवर्गातून निवडणूक लढवणारे सी. ए. सुशील बंदपट्टे यांनी, ‘आपले एक मत अनेक कुटुंबांची आशा आणि आधार ठरू शकते. चांगल्या माणसांना संधी दिली, तर चांगले काम निश्चित घडते,’ असे मतदारांना आवाहन केले.

सारिका विवेक फुटाणे शिक्षण बी. ए. झाले असुन यांचा जन्म वारकरी संप्रदायाची दीर्घ परंपरा लाभलेल्या कुटुंबात झाला. लहानपणापासूनच घरातील कीर्तन, भजन, भागवतधर्म आणि भक्तीमय वातावरणामुळे त्यांच्यावर संस्कारांची मजबूत पायाभरणी झाली. सेवा, करुणा आणि समाजाबद्दलची बांधिलकी हेच त्यांच्या जीवनाचे मूल्य बनले. सामाजिक व राजकीय वारसा लाभलेल्या फुटाणे कुटुंबात सून म्हणून प्रवेश केल्यानंतर, त्यांनी या वारशाला केवळ जपले नाही तर तो अधिक व्यापक केला. महिलांना एकत्र आणून सामाजिक व धार्मिक कायार्ची चळवळ उभी करण्याच्या उद्देशाने त्यांनी 'शिवालय भजनी मंडळा' ची स्थापना केली. या माध्यमातून धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रात त्यांनी बहुमूल्य योगदान दिले. समाजसेविका लताताई फुटाणे यांच्या मार्गदर्शनाखाली सामाजिक कार्य करताना उज्ज्वला गॅस योजनेचा लाभ जवळपास ८०० महिलांना मिळवून देत त्यांना धुरमुक्त व सुरक्षित स्वयंपाकाची सुविधा मिळवून दिली. या भागातील हजारो महिलांना 'लाडकी बहीण' योजनेचा लाभ मिळवून देत आर्थिक आधार दिला. बांधकाम कामगार योजनेचे लाभ अनेक कुटुंबांपर्यंत पोहोचवून त्यांच्या हक्कांचे संरक्षण केले. आरोग्य हेच खरे धन मानून त्यांनी अनेक आरोग्य शिबिरांचे आयोजन केले. मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरातून ८० रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. ९०० नागरिकांना मोफत चष्म्यांचे वितरण करून दृष्टीदानाचे कार्य केले. या भागात ४० बचत गटची बांधणी करून शासनाच्या मार्फत सर्व महिलांना व्यवसायासाठी ३ कोटी हून अधिक कर्ज देण्यात आले. सारिकाताई फुटाणे या केवळ उमेदवार नसून, त्या महिलांची आधारवड, गरिबांचा आवाज आणि समाजाच्या हितासाठी सातत्याने काम करणारी सेवाभावी नेतृत्व आहेत. विकास, आरोग्य, महिला सक्षमीकरण आणि सामाजिक न्याय हेच त्यांचे ध्येय आहे. सेवा, संस्कार आणि संवेदनशीलतेचे नेतृत्व.

कविता आनंद चंदनशिवे या सामाजिक जाणीव असलेले सुशिक्षित सुसंस्कृत व्यक्तिमत्व असून त्यांचे शिक्षण १२ वी पर्यंत झाले आहे. सोलापूर महानगरपालिका निवडणूक प्रभाग क्र ४ मधून अनुसूचित महिला अ गटातून उभ्या आहेत. कविताताई आनंद चंदनशिवे या सोलापूर महानगरपालिकेतील लोकप्रिय नगरसेवक आनंद दादा चंदनशिवे यांच्या धर्मपत्नी असून स्वतःच्या स्वतंत्र सामाजिक ओळखीने त्या परिचित आहेत. कविताताई चंदनशिवे यांना सामाजिक कायार्ची विशेष आवड असून आनंद दादा चंदनशिवे यांच्या विविध सामाजिक उपक्रमांमध्ये त्या सातत्याने सक्रिय सहभाग घेतात. सामाजिक कार्यक्रमांचे नियोजन गरजू कुटुंबांशी थेट संपर्कात असतात महिलांच्या प्रश्नांबाबत संवेदनशीलता आणि प्रत्यक्ष काम हीच त्यांची ओळख आहे. महिला बचत गटांचे संघटन व मार्गदर्शन स्वावलंबनासाठी महिलांना प्रोत्साहन अडचणीत असलेल्या महिलांना आधार देण्याचे कार्य करतात महिलांच्या आरोग्य, शिक्षण व सक्षमीकरणासाठी कार्यरत आहेत पद, प्रसिद्धी किंवा राजकारणापेक्षा माणुसकी, संवाद आणि सहकार्य यांना त्यांनी नेहमी प्राधान्य दिले आहे. महिलांच्या सुख-दुःखात सहभागी होणारी, त्यांच्या अडी-अडचणी ऐकून घेणारी आणि योग्य मार्गदर्शन करणारी हीच कविता चंदनशिवे यांची खरी ओळख आहे. महिलांच्या प्रश्नांना समजून घेणारी, सोबत उभी राहणारी, संवेदनशील व्यक्तिमत्व म्हणजेच... !


VNP MOTORS

VNP MOTORS MULTIBRAND CAR SALES & SERVICE

Multi Brand Car Sales & Services

सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रँड कार चे सुसज्ज शोरूम व वर्कशॉप

OFFER

पेट्रोल कार — SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹2949/-

डिजेल कार — SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹3649/-

AC OVERHAUL — HATCHBACK RS. 2500/- | SEDAN - 3000/- | SUV - 3500/-

FREE PICK-UP & DROP

CNG — RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center

8000-92-8007

Trusted & Approved for Leading Brands

VNP MOTORS Pvt. Ltd.

Exclusive showroom of Second Hand Car Sales & Service

GAT NO .17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007

GOVT. APPROVED CNG RETROFITTMENT CENTER & WORKSHOP


# मतदान यंत्र वितरण, स्ट्रॉग रूम व मतमोजणी केंद्रांची आयुक्त डॉ. ओम्बासे यांची पाहणी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ अंतिम टप्प्यात पोहोचली असून, निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, सुरळीत व सुरक्षितरित्या पार पाडण्यासाठी प्रशासनाकडून सर्वतोपरी तयारी करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर आज महापालिका आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांनी शहरातील मतदान यंत्र वितरण केंद्र, स्ट्रॉग रूम तसेच मतमोजणीसाठी निश्चित करण्यात आलेल्या ठिकाणांना भेट देऊन सखोल पाहणी केली.यावेळी आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी मतदान यंत्रांचे वितरण ऑन-कॅमेरा पद्धतीने व कडक पोलीस बंदोबस्तात होत आहे की नाही, याची तपासणी केली. तसेच स्ट्रॉग रूममधील सुरक्षा व्यवस्था, सीसीटीव्ही निगराणी, प्रवेश-निर्गमन नियंत्रण, सीलिंग प्रक्रिया व २४ तास पहारा याबाबत सविस्तर माहिती घेतली. मतमोजणी केंद्रांवरील बैठक व्यवस्था, विद्युत पुरवठा, अग्निसुरक्षा, सीसीटीव्ही यंत्रणा, कर्मचारी व अधिकाऱ्यांची नियुक्ती तसेच कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने करण्यात आलेल्या उपाययोजनांचीही त्यांनी पाहणी केली.पाहणीदरम्यान आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना स्पष्ट सूचना देत सांगितले की, निवडणूक प्रक्रियेतील प्रत्येक टप्पा अत्यंत दक्षतेने, नियमानुसार व पारदर्शक पद्धतीने पार पाडला जावा. मतदारांचा विश्वास अबाधित ठेवण्यासाठी कोणत्याही प्रकारची हलगर्जीपणा चालणार नसून, सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश त्यांनी दिले.तसेच मतदान यंत्र वितरण, साठवणूक व मतमोजणीदरम्यान सुरक्षा व्यवस्थेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात यावे, आणि भारत निवडणूक आयोग व राज्य निवडणूक आयोगाच्या सर्व मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करण्यात यावे, असेही त्यांनी नमूद केले.या पाहणीवेळी निवडणूक निर्णय अधिकारी सदाशिव पडदुणे, निवडणूक निर्णय अधिकारी अंजिल मुरुड, निवडणूक निर्णय अधिकारी भैरप्पा माळी, नगर अभियंता सारिका आकूलवार,नियंत्रण अधिकारी तपन डंके, निवडणूक विभागातील वरिष्ठ अधिकारी, महापालिकेचे संबंधित विभागप्रमुख, पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक शांततेत, निर्भय व निष्पक्ष वातावरणात पार पाडण्यासाठी प्रशासन सज्ज असल्याचा विश्वास आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी व्यक्त केला.

## संपादकीय

# निवडणुकीत पारदर्शकता का नाही?

लोकशाहीचा पाया असलेल्या निवडणुका जर संशयाच्या भोवऱ्यात सापडत असतील, तर तो केवळ प्रशासकीय अपयश नसून मतदारांच्या विश्वासावरचा थेट आघात ठरतो. सोलापूर महापालिका निवडणुकीच्या निमित्ताने राज्य निवडणूक आयोग व स्थानिक निवडणूक प्रशासनाची भूमिका पाहता, पारदर्शकतेच्या बाबतीत ही यंत्रणा सपशेल अपयशी ठरल्याचे चित्र स्पष्टपणे समोर आले आहे.

पालिका निवडणुकांनंतर आता महापालिका निवडणुकांमध्येही गोंधळ, दिरंगाई आणि माहिती लपवण्याचे प्रकार सातत्याने घडत आहेत. भाजपच्या एबी फॉर्मचा विषय गाजल्यानंतर निवडणूक प्रक्रियेच्या विश्वासार्हतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. काही राजकीय पक्षांनी न्यायालयीन लढाईचा इशाराही दिला आहे, ही बाबच व्यवस्थेच्या अपयशाचे द्योतक आहे.

विशेष म्हणजे, दोन निवडणूक कार्यालयांमध्ये प्रामुख्याने हा गोंधळ झाल्याचे समोर आले आहे. मात्र, या संदर्भात संबंधित निवडणूक अधिकाऱ्याने मुख्य निवडणूक अधिकारी डॉ. सचिन ओंबासे यांना अहवाल दिला की नाही, याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत स्पष्टता नाही. जर अहवाल दिला असेल तर त्यावर काय कारवाई झाली? आणि दिला नसेल तर ही गंभीर बाब दडपण्यामागे नेमका कोणाचा हेतू आहे? हे प्रश्न अनुत्तरित आहेत.

अधिकृत उमेदवारांची अंतिम यादी मिळण्यासाठी उमेदवारांना आणि माध्यमांना दीर्घ प्रतीक्षा करावी लागली. त्यात भर म्हणजे, मतदानाला अवघे पाच दिवस उरले असतानाही उमेदवारांची शपथपत्रे महापालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध नाहीत. ही बाब अत्यंत गंभीर आहे.

शपथपत्रांमधून उमेदवारांची शैक्षणिक पात्रता, स्थावर-जंगम मालमत्ता, गुन्हेगारी पार्श्वभूमी यासारखी महत्त्वाची माहिती मतदारांना मिळते. या माहितीच्या आधारेच मतदार विवेकबुद्धीने निर्णय घेत असतो. मग ही माहिती वेळेत जाहीर न करणे म्हणजे मतदारांच्या नैतिक अधिकारांचे सरळ उल्लंघन नाही काय?

ही दडवादडवी का सुरू आहे, याचे उत्तर प्रशासन देण्यास तयार नाही. पारदर्शकतेचा गवगवा करणारी यंत्रणा अचानक इतकी अपारदर्शक का झाली? लोकसभा व विधानसभा निवडणुका यशस्वीपणे हाताळणारी हीच यंत्रणा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये का ढेपाळते, हा प्रश्न अधिक गंभीर आहे.

निवडणूक प्रक्रिया केवळ उमेदवारांची नाही, तर सामान्य मतदारांच्या हक्कांची असते. माहिती वेळेत न देणे, गोंधळ निर्माण होऊ देणे आणि जबाबदारी टाळणे हे प्रकार लोकशाहीस मारक आहेत. निवडणूक आयोगाने तात्काळ भूमिका स्पष्ट करावी, दोषींवर कारवाई करावी आणि संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक करावी, ही काळाची गरज आहे. अन्यथा, 'निवडणुका म्हणजे लोकशाहीचा उत्सव' हा केवळ घोषवाक्यापुरताच उरेल, आणि लोकशाहीचा आत्माच हळूहळू गुदमरून जाईल.

## सूचना

जिजाऊ जन्मोत्सव सोहळा 2026 साठी मातृतीर्थ सिंदखेडराजा येथे राज्यभरातून येणाऱ्या सर्व जिजाऊ प्रेमींना महत्त्वाच्या सूचना.....

1. आपण कोणत्याही मार्गाने आलात तरी प्रथम आपली वाहने जिजाऊ सृष्टी जवळील पार्किंग मध्ये घेऊन जाणे.
2. जिजाऊसृष्टी वरून जिजाऊ जन्मस्थानाला जाण्यासाठी यावर्षी आयोजन समितीकडून बसेसची व्यवस्था करण्यात आलेली आहे.
3. या बसेसचा चा वापर करून आपण सर्वांनी सहकुटुंब जिजाऊ जन्मस्थान येथे जावे.
4. जिजाऊ जन्मस्थान येथून बसचाच वापर करून जिजाऊ सृष्टी येथे मुख्य कार्यक्रमासाठी यावे. सर्व बस सेवा आयोजन समिती तर्फे निशुल्क करण्यात आलेली आहे
5. यावर्षी जिजाऊ जन्मोत्सवाचे सर्व कार्यक्रम शिवधर्म पिठाकडे नवीन निर्माण केलेल्या डोम मध्ये होणार आहेत.
6. सकाळी दहा वाजल्यापासून सर्व कार्यक्रम सुरू होतील. त्यामध्ये शाहिरी पोवाडे व विशेष सत्कार पहिल्या सत्रामध्ये होतील.
7. जिजाऊ जन्मोत्सवाचा मुख्य कार्यक्रम ठीक दुपारी 12:00 वाजता सुरू होईल. शिवधर्म संसदेतर्फे होणारी मानवंदना तसेच सर्व मान्यवराची भाषणे व मराठा सेवा संघातर्फे दिल्या जाणाऱ्या सर्व मुख्य पुरस्कार वितरण सोहळा संपन्न होईल. क्रांतीपुरुष,युगनायक पुरुषोत्तम खेडेकर साहेबांचे अध्यक्षीय भाषण ठीक बरोबर 03:00 वाजता सुरू होणार आहे.

आलेल्या सर्व समाज बांधवांनी खेडेकर साहेबांचे बहुमूल्य विचार ऐकूनच कार्यक्रम स्थळ सोडावे ही नम्र विनंती.

**आपले नम्र,**
**आयोजन समिती जिजाऊ जन्मोत्सव सोहळा 2026**
#जिजाऊ
मातृतीर्थ सिंदखेडराजा जिल्हा बुलढाणा

**टीप :**

1. सोबत जिजाऊ जन्मोत्सवासाठी रहदारीचा नकाशा जोडलेला आहे.
2. अधिक माहितीसाठी खालील क्रमांकावर संपर्क साधावा 8275520397, 9881743266,9175162548

# आदर्श माता : राजमाता जिजाऊ



हजारो वर्षाची गुलामगिरी, स्त्रियांवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराला आळा घालून माता-भगिणींची अब्रू सुरक्षित राखण्यासाठी, गोरगरीब, कष्टकरी, शेतकरी, श्रमकरी जनतेला हक्काचं, न्यायाचं विचारपीठ उभं केलं. अठरा पगड जातीच्या लोकांना बारा बलुतेदार आणि अठरा अलुतेदारांना सोबत घेऊन महाराष्ट्राच्या मातीमध्ये स्वराज्याचे रणशिंग स्वराज्य संकल्पक शहाजीराजे यांच्या साथीने फुंकले, आणि आपल्या मनातील स्वराज्याचा मानस शिवरायांच्या कार्य आणि कर्तृत्वातून उभा केला. रायगडावर बत्तीस मन सोन्याचं सिंहासन उभं करून जातिवाद्यांना, धर्माच्या ठेकेदारांना नमवून आपल्या वीरपुत्राला छत्रपती बनवून ज्यांनी आपली कारकीर्द इतिहासात नोंदवून ठेवली, आणि इतिहासाने ज्यांच्या कार्य कर्तृत्वाचा ठसा सोनेरी अक्षरांनी लिहून ठेवला अशा मानवतेचे राज्य उभं करणाऱ्या जगातील आदर्श माता राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या जयंती निमित्त हा लेख..

निजामशाहीचे मातब्बर सरदार लखोजीराव जाधव आणि म्हाळसाराणी यांच्या पोटी जन्म 12 जानेवारी 1598 सिंदखेडराजा याठिकाणी.

पराक्रमाची परंपरा लाभलेल्या घराण्यात जिजाऊ वाढू लागल्या. अवघे 8 -10 वर्षे वय असताना त्यांना घोडेस्वारी तलवारबाजी यांसारखे शिक्षण देण्यासाठी लखोजीरावांनी गोमाजी नावाचा विश्वासू सेवक नेमला होता. म्हाळसाराणींनी जिजाऊंच्या जडणघडनिकडे सुरुवातीपासूनच लक्ष दिले होते.त्यांच्या व्यक्तिमत्वात कोणतीच उणीव राहू नये याबाबत त्या दक्ष होत्या. राजघराण्यातील स्त्रियांना विविध भाषेचे ज्ञान असावे या हेतूने जिजाऊंना कानडी, उर्दू, फारशी, हिंदी तसेच संस्कृतचेही धडे दिले होते.

पराक्रमी, सुसंस्कृत, मर्यादशील असणाऱ्या शहाजीराजांशी जिजाऊंचा विवाह झाला आणि तडफदार,दुरदृष्टी असणाऱ्या जिजाऊंनी भोसले घराण्यात प्रवेश केला....

ज्या काळात मराठी मातीमध्ये मनुवाद्यांनी आपलं वर्चस्व प्रस्थापित करून सर्वसामान्य जनतेला पारतंत्र्य आणि गुलामीत ठेवलं होतं. अस्मानी आणि सुलतानीला तोंड देता देता रयत बेजार झाली होती. या पिचलेल्या रयतेला जिजाऊंनी विश्वास देऊन उभं केलं आणि शिवरायांद्वारे स्वराज्य उभारणीचा पाया घातला.

शिवाजी महाराजांसारखा या महाराष्ट्राच्या मातीमध्ये, याच भारतभूमीला मुक्त करण्यासाठी एक महान युगपुरुष त्यांनी घडवला हीच त्यांची सर्वात मोठी कर्तबगारी होय. विरकन्या, विरपत्नी व वीरमाता अशा तीनही भूमिका पार पडण्याचे भाग्य जगातील सर्वच महिलांना लाभले नाही. पण जीजाऊंनी या भूमिका अगदी चोखपणे बजावल्या.

जगातील सर्वच माणसे संस्काराने कर्तृत्ववान बनतात त्यांच्यावरचा पहिला संस्कार त्यांची माता करते हे आपण जाणतोच. अगदी तशाच पद्धतीने शिवरायांची जडणघडण, शिवरायांचे कर्तृत्व, त्यांचा बाणेदारपणा, बुद्धिचातुर्य, स्वाभिमान, साहसी वृत्ती, परस्त्रीला आई - बहिणीची उपमा देण्याचे संस्कार जिजाऊंनी कशा प्रकारे केले असतील ? यावरून जिजाऊंचे विचार किती उच्च असतील याची कल्पना येते.

जिजामाता केवळ शहाजीराजांच्या कर्तबगरीने मोठ्या झालेल्या नव्हत्या तर त्यांच्यात स्वतंत्र बुद्धी, स्वतंत्र कर्तबगारी होती. त्या सर्वसामान्य विचारांच्या नव्हत्या, त्यांचे विचार दुरदृष्टीचे, क्रांतिकारी आणि परिवर्तनवादी होते. त्यांच्या विचारात अन्यायाप्रति चीड आणि युगप्रवर्तनाचं सामर्थ्य दडलेलं होतं.

शिवराय लहान असताना पुणे जहांगिरीची चोख व्यवस्था त्यांनी राखली होती. त्यांच्या या कर्तबगरीचा व गुणांचा गौरव करताना शहाजीराज्यांच्या पदरी असणारा जयराम पिंडे नावाचा कवी म्हणतो...

जशी चंपकेशी फुले फुलजाई।
भली शोभली त्यास जाया जिजाई।।
जिचे कीतीर्चा चंबू जंबुद्वीपाला।
करी साऊली माउली मुलाला।।

या ओळीतून जिजाऊ किती तोलामोलाच्या होत्या, त्यांचे व्यक्तिमत्व किती उच्च प्रतीचे होते हे लक्षात येते.

जिजाऊंचे चरित्र पहिले तर त्यांच्याइतक्या यातना, कष्ट, त्याग, दुःख जगाच्या इतिहासात अन्य कोणत्या स्त्रीने सोसल्या असतील असे वाटत नाही. स्वराज्यासाठी जिजाऊंना फार मोठी किंमत मोजावी लागली होती.

आपल्या पित्यासह माहेरची रक्ताची माणसं निजामशहाच्या दरबारात कापली गेल्याची वार्ता ज्यावेळी जिजाऊंना समजली असेल त्यावेळी त्यांच्यावर दुःखाचा केवढा मोठा डोंगर कोसळला असेल ?आपले जेष्ठ पुत्र संभाजी राजे लढाई लढत असताना शत्रुसैन्याकडून मारले गेल्याची खबर मिळाली तेंव्हा त्यांच्या हृदयाची स्थिती काय झाली असेल ?

शहाजी राजांनी आदिलशाहीचे राज्य कर्नाटकात वाढवण्यासाठी आपली तलवार गाजवली त्याच रणमदार्ला शहाच्या हुकमानुसारच विश्वासघाताने कैद केल्याचे समजले तेंव्हा त्यांच्या मनात किती मोठा संताप, प्रचंड दुःख आणि उद्वेग यांचा कोलाहल माजला असेल ?

दिल्लीपती औरंगजेब बादशहाने त्यांच्या पुत्रास आग्रा येथे सन्मानाने पाचारण करून बोलावले व बंदिवासात टाकल्याचे पाहून त्यांना काय यातना झाल्या असतील ?

मात्र या दुःखाने जिजाऊ अजिबात खचून गेल्या नाहीत,उलट त्यांनी एक खूणगाठ मनाशी बांधली ती अशी की या सर्व सत्ताधीशांच्या सत्तेची फळे कडूच आहेत आणि ही कडू फळे आपल्या भावी पिढ्यांच्या नशिबी यायला नकोत असं वाटत असेल तर त्यावर एकच उपाय तो म्हणजे स्वराज्याची स्थापना. हाच नव्या युगाचा मंत्र त्यांनी आपल्या पुत्रास शिवरायांस दिला आणि याच दिव्य मंत्राने शिवरायांनी आपल्या आऊसाहेबांचे स्वप्न सत्यामध्ये उतरवलं. शिवरायांसारखा महापुरुष घडवत असताना जिजाऊंची भूमिका केवळ मातेची नव्हती तर त्या शिवरायांच्या पहिल्या गुरू आणि खऱ्या मार्गदर्शक होत्या. लोककल्याणासाठी त्यांनी अनेकदा आपल्या पुत्राला मृत्यूच्या खाईत ढकललं.

पुण्यातील शापित जमीन लागवडीखाली आणून दहशत पसरविणाऱ्यांना शह दिला.

शहाजीराजांच्या मृत्यूनंतर खचून न जाता त्यांचं अर्धवट राहिलेलं स्वराज्याचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी सती न जाता त्या पुन्हा नव्या जोमाने आणि जिद्दीने उभ्या राहिल्या आणि सतीची प्रथा बंद केली. सतीची प्रथा बंद करण्याचा सर्वात पहिला मान मिळतो तो म्हाळसारानी आणि जिजाऊंना.

15 ऑगस्ट 1666 रोजी शिवाजी महाराज आग्रा येथून निसटले तेंव्हा जिजाऊंनी रांगणा किल्ला स्वतः जिंकून शिवरायांना भेट दिला होता.

याचा आजच्या प्रत्येक आईने आदर्श घ्यावा. जोपर्यंत या महाराष्ट्रात जिजाऊंसारखी चतुर भल्या भल्या शुरविरांना लाजवेल अशी रणनीती वापरणारी महिला जन्माला येत नाही तोपर्यंत शिवरयांसारखा महापुरुष जन्माला येणं शक्य नाही...

आपल्या स्वराज्य उभारणीसाठी 12 मावळातील लोक एकत्र करून स्वराज्याचा पाया भक्कम केला.

दक्षिणेत मराठ्यांचे स्वातंत्र्य व सार्वभौम राज्य स्थापन केलं. हे राज्य कोण्या एका धमार्च, पंथाचं, कोण्या एका जातीचं नव्हतं तर ते बारा बलुतेदार आणि अठरा अलुतेदार यांचं राज्य होतं.

**हे राज्य अवघ्यांचे सर्व जातीपातींनी ते रक्षावे**

या वाक्यास साजेसा इतिहास या मातीत घडला. पुढे छत्रपती शिवाजी महाराजांनी समुद्रात आरमार उभे करून, महाराष्ट्राच्या कड्याकपारीत गडकिल्ले बांधून, राज्यभिषेक करवून घेतला आणि स्वतःस छत्रपती म्हणून घोषित करून अखंड महाराष्ट्राचा इतिहास बदलून टाकला. आणि या सर्व घटनांच्या जिजाऊ स्वतः साक्षीदार बनल्या.

जगातील मान्यवरांनी ज्यांच्या कार्याची, कर्तृत्वाची दखल घेऊन दुर्गम आणि बेलाग असणाऱ्या रायगडावर राज्याभिषेकास हजर राहून त्यांच्या कायार्ला आणि कर्तुत्वाला मुजरा केला अशा महाराष्ट्राच्या मातीतील आगळ्या वेगळ्या, देखण्या सोहळ्याच्या साक्षीदार झालेल्या राजमाता जिंजाऊंनी समाधानाने आपला देह रायगडाच्या पायथ्याला आपल्या राहत्या वाड्यात पाचाड येथे ठेवला आणि या महाराष्ट्रालाच नव्हे तर भारताला गुलामगिरीची बंधने तोडायला शिकवून स्वातंत्र्यासाठी प्रेरित व्हायला शिकवले...

जिजाऊ साहेब देहाने जरी आपल्यातून निघून गेल्या असल्या तरी त्यांच्या विचारांनी प्रेरित झालेला एकेक मावळा, एकेक रणरागिणी महाराष्ट्रात क्रांतीची मशाल हातात घेऊन जिजाऊंचा वारसा सन्मानाने जपताना दिसत आहे.

अशा या आदर्श मातेला क्रांतीकारी विनम्र अभिवादन आणि मानाचा मुजरा.

**रंजना शिवाजी पाटील,**
जिजाऊ ब्रिगेड, कोल्हापूर.
सौजन्य :- फेसबुक

# युवाशक्तीचे राष्ट्रनिर्माण आणि समाजपरिवर्तनातील स्थान




१२ जानेवारी हा दिवस भारतात 'राष्ट्रीय युवा दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस केवळ स्वामी विवेकानंदांच्या जयंतीचा स्मरणोत्सव नसून तो भारतीय युवकांच्या आत्मभानाचा, सामाजिक जबाबदारीचा आणि राष्ट्रनिर्मितीच्या ध्येयाचा वैचारिक उत्सव आहे. विवेकानंदांनी युवकांना केवळ उद्याचे नागरिक म्हणून पाहिले नाही, तर आजच्या समाजाचे निर्णायक शिल्पकार म्हणून ओळखले. समाजशास्त्रीय दृष्टीने युवक हा कोणत्याही समाजातील सर्वाधिक गतिमान, सर्जनशील आणि परिवर्तनक्षम घटक असतो. सामाजिक रूढी, परंपरा, अन्याय आणि विषमता यांना प्रश्न विचारण्याची ताकद युवकांमध्येच असते. म्हणूनच राष्ट्रीय युवा दिन हा दिवस युवकांच्या ऊर्जेला योग्य दिशेने वळवण्याचा आणि समाजाला आत्मपरीक्षण करण्यास प्रवृत्त करणारा ठरतो.

भारतीय समाजाची लोकसंख्यात्मक रचना पाहिली तर आपण युवकप्रधान राष्ट्र आहोत. देशातील मोठा हिस्सा १५ ते ३५ वयोगटातील आहे. हे वास्तव भारतासाठी सुवर्णसंधी असली तरी त्याचबरोबर मोठे सामाजिक आव्हानही आहे. योग्य शिक्षण, कौशल्य, आरोग्य आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्यास ही युवकसंख्या राष्ट्राच्या आर्थिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक प्रगतीचा कणा ठरू शकते. परंतु समाजशास्त्र सांगते की संधींचे असमान वितरण, वर्गभेद, जातीय विषमता, ग्रामीणझ्शहरी दरी आणि लिंगाधारित भेदभाव युवकांच्या क्षमतेला मयार्दा घालतात. आजही मोठ्या प्रमाणावर युवक बेरोजगारी, अल्परोजगार आणि अस्थिर कामाच्या विळख्यात अडकलेले आहेत. शिक्षण असूनही सन्मानजनक रोजगार न मिळाल्याने युवकांमध्ये निराशा, असंतोष आणि सामाजिक तणाव वाढत आहे. हा असंतोष वैयक्तिक अपयशाचा नव्हे, तर सामाजिक-आर्थिक रचनेतील अपुरेपणाचा परिणाम आहे.

स्वामी विवेकानंदांनी युवकांना आत्मविश्वास, स्वाभिमान आणि ध्येयवादाचा संदेश दिला. 'उठा, जागे व्हा आणि ध्येय साध्य होईपर्यंत थांबू नका' हा त्यांचा मंत्र आजच्या अस्थिर आणि स्पर्धात्मक जगात अधिकच अर्थपूर्ण ठरतो. डिजिटल माध्यमांच्या युगात युवक सतत तुलना, प्रसिद्धी आणि बाह्य यशाच्या दबावाखाली जगत आहेत. सोशल मीडियावर निर्माण होणाऱ्या आभासी प्रतिमा अनेकांना न्यूनगंड, एकाकीपणा आणि नैराश्याकडे ढकलतात. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून हे 'ओळखीचे संकट' आहे, जिथे व्यक्ती स्वतःचे मूल्य समाजाने ठरवलेल्या निकषांवर मोजते. विवेकानंदांचा आत्मसन्मानाचा विचार युवकांना अंतर्गत सामर्थ्यावर उभे राहण्याची प्रेरणा देतो, जी सामाजिक सशक्तीकरणासाठी अत्यावश्यक आहे.

शिक्षण हा युवकांच्या सामाजिक उन्नतीचा कणा आहे. परंतु आजचे शिक्षण बहुतेक वेळा केवळ बाजारपेठेच्या गरजांपुरते मर्यादित राहिले आहे. पदवी, गुण आणि प्रमाणपत्रे मिळतात, पण सामाजिक भान, नैतिकता आणि नागरिकत्वाची जाणीव दुर्लक्षित राहते. विवेकानंदांनी शिक्षणाला 'चरित्रनिर्मिती' असे संबोधले होते. समाजशास्त्रीयदृष्ट्या पाहिले तर शिक्षित पण सामाजिकदृष्ट्या असंवेदनशील युवक समाजासाठी घातक ठरू शकतो. शिक्षणाने युवकांना केवळ रोजगारासाठी नव्हे, तर जबाबदार नागरिक म्हणून घडवले पाहिजे, जे अन्याय, भेदभाव आणि शोषणाविरुद्ध उभे राहतील. शिक्षणातून वैज्ञानिक दृष्टिकोन, लोकशाही मूल्ये आणि सामाजिक न्यायाची जाणीव निर्माण होणे आवश्यक आहे.

जागतिकीकरण, खाजगीकरण आणि तंत्रज्ञानामुळे युवकांच्या आयुष्यात मोठे बदल घडले आहेत. एकीकडे नव्या संधी, माहिती आणि जागतिक संपर्क उपलब्ध झाले आहेत, तर दुसरीकडे अस्थिर रोजगार, स्थलांतर, कौटुंबिक ताण आणि मानसिक असुरक्षितता वाढली आहे. ग्रामीण युवक शेतीतील अनिश्चित उत्पन्न आणि नैसर्गिक आपत्तींच्या धोक्यामुळे शहरांकडे स्थलांतर करतात, परंतु शहरांमध्येही त्यांना सन्मानजनक जीवन, सुरक्षित काम आणि सामाजिक आधार हमखास मिळेलच असे नाही. समाजशास्त्र सांगते की जेव्हा युवकांच्या अपेक्षा आणि वास्तव यातील दरी वाढते, तेव्हा सामाजिक तणाव, आंदोलन आणि अस्थिरता निर्माण होते. त्यामुळे युवकांच्या समस्यांकडे वैयक्तिक नव्हे, तर संरचनात्मक दृष्टिकोनातून पाहणे आवश्यक आहे.

लोकशाहीमध्ये युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. युवक हे मतदार, कार्यकर्ते, स्वयंसेवक आणि विचारवंत म्हणून लोकशाहीला ऊर्जा देतात. परंतु आज अनेक युवक राजकारणापासून दूर राहतात, कारण त्यांना राजकीय व्यवस्था भ्रष्ट, गुंतागुंतीची आणि सामान्य माणसापासून दूर वाटते. विवेकानंदांनी मात्र सामाजिक आणि राष्ट्रीय प्रश्नांवर सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले. त्यांच्या मते राष्ट्र म्हणजे केवळ भौगोलिक रचना नसून लोकांचे जिवंत संघटन आहे. युवक जेव्हा सामाजिक अन्याय, भ्रष्टाचार, पर्यावरणीय संकटे आणि मानवी हक्कांच्या उल्लंघनाविरुद्ध आवाज उठवतात, तेव्हाच लोकशाही सशक्त होते आणि राज्यसत्ता अधिक उत्तरदायी बनते.

स्त्री-पुरुष समानता, जातीय समता आणि सामाजिक न्याय या मूल्यांशिवाय युवकांचे सशक्तीकरण अपूर्ण आहे. आजही अनेक तरुणी शिक्षण, रोजगार आणि सार्वजनिक आयुष्यात भेदभावाचा सामना करतात. बालविवाह, लैंगिक हिंसा, कामाच्या ठिकाणी असमानता आणि प्रतिनिधित्वाचा अभाव या समस्या युवकवयातच त्यांच्या प्रगतीला मयार्दा घालतात. विवेकानंदांनी स्त्रीला राष्ट्राची शक्ती मानले. समाजशास्त्रीयदृष्ट्या पाहिले तर जे समाज आपल्या स्त्रियांना संधी देतात, तेच समाज प्रगत होतात. युवकांनी लिंगभाव, जात आणि वर्गाच्या पलीकडे जाऊन समतेचा स्वीकार करणे हीच खरी सामाजिक क्रांती आहे.

जातव्यवस्था, आदिवासी व दलितांचे प्रश्न, अल्पसंख्यांकांचे हक्क आणि प्रादेशिक असमतोल या भारतीय समाजातील दीर्घकालीन समस्या आहेत. युवक जर या प्रश्नांकडे उदासीन राहिले, तर अन्याय टिकून राहतो. परंतु युवक जागरूक झाले, तर सामाजिक बदल शक्य होतो. विवेकानंदांनी मानवतेवर आधारित राष्ट्रवादाचा पुरस्कार केला, जो सर्वांना समान संधी आणि सन्मान देणारा आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून युवकांनी बहुसांस्कृतिकता, सहअस्तित्व आणि सामाजिक सलोखा यांची कास धरली पाहिजे.

तंत्रज्ञान आणि माध्यमांनी युवकांच्या विचारविश्वाला नवे आयाम दिले आहेत. माहितीच्या महासागरात वावरताना सत्य आणि असत्य, ज्ञान आणि प्रचार यातील फरक ओळखणे अत्यंत महत्त्वाचे झाले आहे. विवेकानंदांनी विवेकबुद्धी आणि चिंतनशीलतेवर भर दिला. आजच्या युवकांनीही तंत्रज्ञानाचा उपयोग शिक्षण, संशोधन, समाजसेवा आणि लोकशाही सशक्त करण्यासाठी करणे गरजेचे आहे, अन्यथा तेच तंत्रज्ञान द्वेष, अफवा आणि विभाजन पसरवण्याचे साधन ठरू शकते.

पर्यावरणीय संकट, हवामान बदल, जलसंकट आणि जैवविविधतेचा ऱ्हास हे आजच्या युवकांसमोर उभे असलेले मोठे आव्हान आहे. भविष्यातील पिढ्यांचे हक्क जपण्यासाठी युवकांनी शाश्वत विकासाची भूमिका स्वीकारणे आवश्यक आहे. विवेकानंदांनी निसगार्शी सुसंवाद साधण्याचा विचार मांडला होता. समाजशास्त्रीयदृष्ट्या पाहिले तर पर्यावरणीय न्याय आणि सामाजिक न्याय हे एकमेकांशी जोडलेले आहेत. गरीब आणि वंचित समुदायांवर पर्यावरणीय ऱ्हासाचा सर्वाधिक परिणाम होतो, त्यामुळे युवकांनी या प्रश्नांवर संवेदनशील असणे गरजेचे आहे.

राष्ट्रीय युवा दिन हा केवळ उत्सवाचा नव्हे, तर आत्मपरीक्षणाचा दिवस आहे. आपण आपल्या युवकांना केवळ स्पर्धात्मक यशासाठी घडवत आहोत की त्यांना संवेदनशील, जबाबदार आणि सामाजिकदृष्ट्या जागरूक नागरिक बनवत आहोत, हा प्रश्न विचारण्याची ही वेळ आहे. विवेकानंदांचे स्वप्न असे युवक घडवण्याचे होते जे स्वतःसाठीच नव्हे, तर समाजासाठी जगतील. आजच्या भारताला अशाच युवकांची गरज आहे जे विज्ञान, तंत्रज्ञान आणि आधुनिकतेसोबत करुणा, समता आणि मानवतावाद यांची सांगड घालतील.

अखेर, युवक हीच राष्ट्राची खरी संपत्ती आहे. त्यांची ऊर्जा, सर्जनशीलता आणि परिवर्तनाची आस हीच समाजाला पुढे नेते. राष्ट्रीय युवा दिनानिमित्त आपण स्वामी विवेकानंदांच्या विचारांकडे केवळ गौरवाने पाहू नये, तर ते आपल्या शिक्षणात, कामात आणि सामाजिक जीवनात उतरवावेत. कारण जेव्हा युवक स्वतःला बदलतो, तेव्हाच समाज बदलतो; आणि जेव्हा समाज बदलतो, तेव्हाच भारत देश खऱ्या अर्थाने समताधिष्ठित, सशक्त आणि प्रगत राष्ट्र म्हणून उभा राहू शकतो.

**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत),
bagate.rajendra5@gmail.com

# प्रत्येक कुटुंबासाठी कुटुंबातील प्रत्येकासाठी प्राइड ऑफ सोलापूर असलेले- आर्द्रा मॉल

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** रोजचे कपडे तसेच लग्न बस्ता खरेदीसाठी सर्व प्रकारच्या ग्राहकांचे आवडते सोलापुर जिल्ह्यातील सर्वात मोठे नवीन लोकेशन म्हणजे आर्द्रा मॉल होय. सोलापूर जिल्ह्यासह लातूर, धाराशिव आणि बीड येथील ग्राहक लग्नाचा बस्ता खरेदीसाठी प्राइड ऑफ सोलापूर असलेल्या आर्द्रा मॉल ला भेट देण्यात येत असल्याचे संचालक शुभम भुतडा यांनी सांगितले.

सम्राट चौक येथील डी मार्ट समोर असलेल्या अर्ध मॉल मध्ये सोलापूर जिल्ह्यातील अकलूज माळशिरस करमाळा बार्शी पंढरपूर तसेच मोहोळ आणि अक्कलकोट येथील ग्राहक मोठ्या प्रमाणात लग्नाचा बस्ता खरेदी करण्यासाठी येत असल्याचे त्यांनी सांगितले.

खूप काही खरेदी करा पण खूप कमी पैसे देऊ सर्व काही एकाच ठिकाणी कपडे खरेदी करण्याचे सोलापुरातील एकमेव आर्द्रा मॉल नवीन डेस्टिनेशन असल्याचे त्यांनी सांगितले. यात प्रामुख्याने सिल्क सारीज जसे की कांजीवरम, बनारस, शालू, घागरा, शेरवानी आणि इतर वापरावयाच्या साड्या तसेच ड्रेस मटेरियल खूप कमी किमतीत मिळत असल्यामुळे लग्नाचा बस्ता खरेदीसाठी ग्राहक मोठ्या प्रमाणे गर्दी करीत आहेत.

आर्द्रा मॉल मध्ये शूटिंग शर्टिंग ड्रेस मटेरियल इथेनिक वेअर इनर वेअर किड्स रेडीमेड सर्व प्रकारचे ओझरी मॅचिंग वेअर आणि इतर सर्व रेडिमेड कपडे ग्राहकांकरिता उपलब्ध आहेत तेही होलसेल दरात त्यामुळे सोलापुरातील आणि इतर जिल्ह्यातील तरुण वर्ग मोठ्या प्रमाणात खरेदीसाठी आर्द्रा मॉलची निवड करीत असल्याचे त्यांनी सांगितलं.



## बेताल बोल

### चकटफूचे अश्वासन

त्यांनी दिले, आम्ही देतो
बोला काय काय हवे...
फुकटाचे दुकान उघडले
सर्वांनी काहीतरी न्यावे...
फक्त बहिणच लाडकी नाही
तुम्हाला पण मदत करू...
आणि एक गोष्ट ध्यानी ठेवू
एकमेकांना सहाय्य करू...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# महाराष्ट्र कोर्ट लीगचा बक्षीस वितरण सोहळा जनमेजयराजे भोसले यांच्या हस्ते संपन्न




**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** पुणे दिघी येथील मोझे विद्यालया जवळील आर.एस.पी. क्रिकेट ग्राउंड (तापकीर ग्राउंड) येथे आयोजित करण्यात आलेल्या पुणे जिल्हा न्यायालयीन कर्मचारी कला व क्रीडा मंडळ पुणे व महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी क्रीडा व कल्याण संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धा २०२५-२६ महाराष्ट्र कोर्ट प्रीमियर लीग -२०२६ चा बक्षीस वितरण सोहळा श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या हस्ते मोठ्या थाटामाटात संपन्न झाला.

यावेळी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांचा सत्कार पुणे जिल्हा न्यायालयीन कर्मचारी कला व क्रीडा मंडळ पुणे व महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी क्रीडा व कल्याण संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धा २०२५-२६ महाराष्ट्र कोर्ट प्रीमियर लीग -२०२६ यांच्या वतीने करण्यात आला.

या प्रसंगी पुणे जिल्हा प्रमुख व सत्र न्यायाधीश महेंद्र महाजन, पुणे जिल्हा न्यायाधीश १ बी.व्ही. वाघ, महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष दिगंबर निकम, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, क्रियाशील सदस्य संदीप फुगे -पाटील पुणे, मध्यवर्ती न्यायालयीन कर्मचारी क्रीडा व कल्याण संस्था छ.संभाजी नगर चे अध्यक्ष ज्ञानेश्वर लिंबोळे, पुणे जिल्हा न्यायालयाचे प्रबंधक- सुनेत्रा जोशी, पुणे लघुवाद न्यायालयाचे प्रबंधक रफिक तांबोळी, पुणे जिल्हा न्यायालयीन कर्मचारी कला व क्रीडा मंडळ पुणे चे अध्यक्ष योगेश पवार, ज्युडीशियल स्टार पुण्याचे कार्याध्यक्ष - जोतीराम लावंड आदिजन उपस्थित होते.

महाराष्ट्रातील न्यायालयीन कर्मचारी व श्री क्षेत्र अक्कलकोट चे शिवराज स्वामी, मैनुद्दीन कोरबू, सर्फराज शेख, प्रशांत साठे, महांतेश स्वामी, गोकुळ पाटील, असद फुलारी हे उपस्थित होते.

## जाहिर प्रसिध्दीकरण अर्ज.नं. /२०२५

**मोहोळ येथील मे.तहसिलदार साहेब यांचे समोर**

नसरोद्दिन खाजोद्दिन पटेल, वय-३१वर्षे, धंदा-शेती, रा.मिरी, ता.मोहोळ, जि.सोलापूर } अर्जदार

**विरूध्द**

मोहोळ नगरपरिषद मोहोळ }सामनेवाला

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार यांची नसरोद्दिन खाजोद्दिन पटेल जन्म दि.१९/६/१९९३ व बहिणी तब्बसुम खाजोद्दिन पटेल जन्म दि.१/३/१९९१, शाहिस्ता खाजोद्दिन पाटील जन्म दि.१/६/१९९५, तस्लीम खाजोद्दिन पटेल जन्म दि.१/१२/१९८८ रोजी मोहोळ, ता.मोहोळ,जि.सोलापूर येथे झाला आहे.

अर्जदार याने सदर सामनेवाला यांच्याकडे अर्जदार यांची नसरोद्दिन खाजोद्दिन पटेल व बहिणी तब्बसुम खाजोद्दिन पटेल शाहिस्ता खाजोद्दिन पाटील, तस्लीम खाजोद्दिन पटेल यांच्या जन्माबाबत सामनेवाला यांच्याकडे जन्म दाखल्याची तारीख वरील नमुद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे जून १९९३, मार्च १९९१, जुन १९९५ व डिसेंबर १९८८ चे आभिलेखात अर्जदार यांची व बहिणींची जन्मनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात जन्माची नोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यासदि.२६/१/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे. ता. ९/१/२०२६

सही/-
शिक्का
तहसिलदार,मोहोळ.

## जाहिर प्रसिध्दीकरण अर्ज.नं. /२०२५

**मोहोळ येथील मे.तहसिलदार साहेब यांचे समोर**

बशीर अमीन बागवान, वय-४९वर्षे, धंदा-मजुरी, रा.मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर } अर्जदार

**विरूध्द**

मोहोळ नगरपरिषद मोहोळ }सामनेवाला

ज्याआर्थी वर नमुद अर्जदार यांची बशीर अमीन बागवान जन्म दि.१/६/१९७६ रोजी मोहोळ, ता.मोहोळ,जि.सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांच्याकडे अर्जदार यांची बशीर अमीन बागवान यांच्या जन्माबाबत सामनेवाला यांच्याकडे जन्म दाखल्याची तारीख वरील नमुद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे जून १९७६चे आभिलेखात अर्जदार यांची जन्मनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात जन्माची नोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.२६/१/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे. ता.९/१/२०२६

सही/-
शिक्का
तहसिलदार,मोहोळ.

## जाहिर प्रसिध्दीकरण अर्ज.नं. /२०२५

**मोहोळ येथील मे.तहसिलदार साहेब यांचे समोर**

कबीर महिबूब कोरबू, वय-५०वर्षे, धंदा-मजुरी, रा.मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर } अर्जदार

**विरूध्द**

मोहोळ नगरपरिषद मोहोळ }सामनेवाला

ज्याआर्थी वर नमुद अर्जदार यांची मुलगी तब्बसुम कबीर कोरबू जन्म दि.१/६/१९९७ रोजी मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांच्याकडे अर्जदार यांची मुलगी तब्बसुम कबीर कोरबू यांच्या जन्माबाबत सामनेवाला यांच्याकडे जन्म दाखल्याची तारीख वरील नमुद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे जून १९९७ चे आभिलेखात अर्जदार यांची मुलगी यांची जन्मनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या मे. कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात जन्माची नोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.२६/१/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामने वाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे.ता.९/१/२०२६

सही/-
शिक्का
तहसिलदार,मोहोळ.

## जाहिर प्रसिध्दीकरण अर्ज.नं. /२०२५

**मोहोळ येथील मे.तहसिलदार साहेब यांचे समोर**

कबीर महिबूब कोरबू, वय-५०वर्षे, धंदा-मजुरी, रा. हल्ली मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर } अर्जदार

**विरूध्द**

ग्रामपंचायत देगाव (वा), ता.मोहोळ }सामनेवाला

ज्याआर्थी वर नमुद अर्जदार यांचा कबीर महिबूब कोरबू जन्म दि.१/६/१९७५ रोजी देगाव(वा), ता.मोहोळ, जि.सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांच्याकडे कबीर महिबूब कोरबू यांच्या जन्माबाबत सामनेवाला यांच्याकडे जन्म दाखल्याची तारीख वरील नमुद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे जून १९९७ चे आभिलेखात अर्जदार यांची मुलगी यांची जन्मनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या मे.कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात जन्माची नोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.२६/१/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामने वाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे.ता.९/१/२०२६

सही/-
शिक्का
तहसिलदार,मोहोळ.

## जाहिर प्रसिध्दीकरण अर्ज.नं. /२०२५

**मोहोळ येथील मे.तहसिलदार साहेब यांचे समोर**

रामचंद्र बाळू मासाळ, रा.वडदेगाव, ता.मोहोळ, जि.सोलापूर } अर्जदार

**विरूध्द**

ग्रापंचायत वडदेगाव, ता.मोहोळ }सामनेवाला

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार यांच्या बहिणीचा मुलगा गणेश बाळासाहेब देवकते दि.२/२/२०१० रोजी वडदेगाव ता. मोहोळ. जि. सोलापूर येथे झाला आहे. जन्म अर्जदार याने सदर सामनेवाला गणेश बाळासाहेब देवकते यांच्या जन्मा बाबत सामनेवाला यांच्याकडे जन्म दाखल्याची वरील नमुद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे फेब्रुवारी २०१० चे आभिलेखात अर्जदार यांच्या बहिणीचा मुलगा याची जन्मनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात जन्मनोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.२६/१/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे ता.९/१/२०२६

सही/-
शिक्का
तहसिलदार,मोहोळ.

## जाहिर प्रसिध्दीकरण अर्ज.नं. /२०२५

**मोहोळ येथील मे.तहसिलदार साहेब यांचे समोर**

रौफ जाफर तांबोळी, रा.पेनूर,ता.मोहोळ,जि.सोलापूर } अर्जदार

**विरूध्द**

ग्रापंचायत पेनूर, ता.मोहोळ }सामनेवाला

ज्याआर्थी वर नमुद अर्जदार यांच्या भावाची मुले अहमद रशीद तांबोळी जन्म दि.१/६/१९८६, अय्युब रशीद तांबोळी जन्म दि.१३/९/१९८७ रोजी पेनूर ता.मोहोळ. जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला अहमद रशीद तांबोळी, अय्युब रशीद तांबोळी यांच्या जन्माबाबत सामनेवाला यांच्याकडे जन्म दाखल्याची वरील नमुद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे जून १९८६, सप्टेबर १९८७ चे आभिलेखात अर्जदार यांच्या व भावाची जन्मनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात जन्मनोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.२६/१/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे ता.९/१/२०२६

सही/-
शिक्का
तहसिलदार,मोहोळ.

## जाहिर प्रसिध्दीकरण अर्ज.नं. /२०२५

**मोहोळ येथील मे.तहसिलदार साहेब यांचे समोर**

रौफ जाफर तांबोळी, रा.पेनूर,ता.मोहोळ,जि.सोलापूर } अर्जदार

**विरूध्द**

ग्रापंचायत पेनूर, ता.मोहोळ }सामनेवाला

ज्याआर्थी वर नमुद अर्जदार यांचा रौफ जाफर तांबोळी जन्म दि.१/६/१९६९, भाऊ अब्दुल हमीद जाफर तांबोळी जन्मं दि.२६/९/१९६०, अकबर जाफर तांबोळी जन्म दि.२/३/१९७३ रोजी पेनूर,ता.मोहोळ, जि.सोलापूर येथे झाला आहे.अर्जदार याने सदर सामनेवाला रौफ जाफर तांबोळी, भाऊ अब्दुल हमीद जाफर तांबोळी, अकबर जाफर तांबोळी यांच्या जन्मा बाबत सामनेवाला यांच्याकडे जन्म दाखल्याची वरील नमुद तारखेनुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे जून १९६९, सप्टेबर १९६०, मार्च १९७३ चे आभिलेखात अर्जदार यांच्या व भावाची जन्मनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात जन्मनोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.२६/१/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी.हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे ता.९/१/२०२६

सही/-
शिक्का
तहसिलदार,मोहोळ.

# व्हॉईस ऑफ मीडिया, बार्शीच्या वतीने पत्रकार दिन साजरा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक, दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त (पत्रकार दिन) व्हॉईस ऑफ मीडिया, शाखा बार्शी यांच्या वतीने ज्येष्ठ पत्रकारांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बाजार समितीचे सभापती विजय गरड हे होते.प्रमुख उपस्थितीत उपविभागीय पोलीस अधिकारी अशोक सायकर, व्हॉईस ऑफ मीडिया - इंटरनॅशनल फोरमचे प्रदेश उपाध्यक्ष अजित कुंकूलीळ,भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष रणवीर राऊत, डॉ. श्रीधर अंधारे उपस्थित होते.

यावेळी पत्रकार दिनानिमित्त खालील ज्येष्ठ पत्रकारांचा सन्मान करण्यात आला -

सचिन अपसिंगकर (दैनिक सुराज्य), उमेश पवार (दैनिक सकाळ), विजय निलाखे (दैनिक दिव्य मराठी), शहाजी फुरडे (दैनिक लोकमत), धैर्यशील पाटील (संपादक - सत्यचित्र), सिकंदर आतार (संपादक - भगवंत एक्सप्रेस). या कार्यक्रमाचे आयोजन प्रविण पावले (राज्य कोषाध्यक्ष, VOM - डिजिटल विंग),ओंकार हिंगमिरे (सोलापूर जिल्हा सचिव, VOM),निलेश झिंगाडे (बार्शी शहराध्यक्ष, VOM),मयूर थोरात (बार्शी शहर उपाध्यक्ष),समाधान चव्हाण (बार्शी शहर सचिव) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.



यावेळी बोलताना उपविभागीय पोलीस अधिकारी अशोक सायकर म्हणाले की, पत्रकार हा समाजाचा आरसा असून समाजात घडणाऱ्या चांगल्या-वाईट घटनांचे सत्य निर्भीडपणे समाजासमोर मांडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य पत्रकार करतात. प्रशासनातील त्रुटी दाखवून त्या दुरुस्त करण्यासाठी प्रशासनाला भाग पाडण्याचे काम पत्रकार करतात.

रणवीर राऊत यांनी पत्रकारांना लोकशाहीचा चौथा स्तंभ संबोधत, सत्याच्या मुळाशी जाऊन बातमी करताना सामाजिक जबाबदारीचे भान राखणे आवश्यक आहे, असे मत व्यक्त केले.

अध्यक्षीय भाषणात विजय गरड म्हणाले की, राजकारणात योग्य निर्णय व चांगल्या कामाची पोचपावती मिळण्यासाठी प्रामाणिक व अचूक पत्रकारितेची नितांत गरज आहे.

तर अजित कुंकूलीळ यांनी व्हॉईस ऑफ मीडियाच्या माध्यमातून पत्रकारांच्या प्रश्नांसाठी संपूर्ण महाराष्ट्रात कार्य सुरू असून, पत्रकार व त्यांच्या कुटुंबियांसाठी आरोग्य विमा, शिक्षणविषयक मदत तसेच विविध प्रश्न शासन दरबारी मांडून निर्णय घेण्यास भाग पाडण्यात संघटनेला यश आले आहे, असे सांगितले.

### कार्यक्रमास व्हॉईस ऑफ मीडिया संघटनेचे सदस्य

प्रदीप माळी, उमेश काळे, शाम थोरात, विजय शिंगाडे, जमीर कुरेशी, विक्रांत पवार, पवन श्रीश्रीमाळ, अपर्णा दळवी, ऋषीकेश अंधारे, आतिश कसबे, मल्लिकार्जुन धारूरकर यांच्यासह अनेक पत्रकार उपस्थित होते.

# जलजीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन ग्रामीण चे कर्मचारी यांचे वेतनासाठी मुख्यमंत्र्यांना साकडे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जलजीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन ग्रामीण अंतर्गत महाराष्ट्रातील 34 जिल्ह्यात जिल्हा परिषद अंतर्गत जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षात विविध पदावर कंत्राटी तत्त्वावर कर्मचारी कार्यरत कर्मचारी यांचे चार महिनेचे वेतन शासनाकडे प्रलंबित आहे. या मागणी साठी कंत्राटदार संघटनेचे अध्यक्ष मिलिंद भोसले यांनी पुढाकार घेतला आहे.



आज सोलापूर येथे राज्य पाणी व स्वच्छता कृती समितीचे वतीने कृती समितीचे अध्यक्ष रमाकांत गायकवाड व कार्याध्यक्ष सचिन जीधव यांनी अध्यक्ष मिलिंद भोसले यांची शिष्ट मंडळासह भेट घेतली. मिलींद भोसले यांनी जलजीवन मिशन चे कर्मचारी यांचा दिपावली तील दोन महिनेचे थकित वेतन देणेसाठी प्रयत्न केली होता. त्यात त्यांना यश आले होते.

राज्य स्तरावर निधी उपलब्ध असूनही तांत्रिक कारण पुढे केलेमुळे कर्मचारी यांना चार महिने वेतन नाही.

सदर विभागासाठी राज्य शासनाकडून कर्मचारी यांचे वेतनासाठी 10 कोटी इतका निधी नियतव्यय मंजूर आहे.सदर निधी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागास प्राप्त होईपर्यंत उपलब्ध निधीतून सदर कर्मचारी यांचे वेतन अदा करणेत आलेले नाही.

राज्य सन 2003 पासून टप्प्याने भरतीनुसार हे कर्मचारी कार्यरत आहेत. 1 नोव्हेंबर 2012 च्या शासन निर्णयाद्वारे जिल्हा स्तरावर राष्ट्रीय पेयजल कार्यक्रम व निर्मल भारत अभियान या प्रकल्पासाठी जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष ची स्थापना करून यामध्ये जिल्हा व तालुकास्तरावर कंत्राटी कर्मचारी यांचे कार्यपूर्ती जबाबदारी व फलनिष्पती निश्चित करून राज्य शासनाकडून पाणी व स्वच्छता कामाचे सनियंत्रण केले जात आहे.

जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष स्थापन केलेपासून महाराष्ट्र शासनाचा पाणी व स्वच्छतेच्या कामात केंद्र शासनाकडून नेहमी गौरव करण्यात आलेला आहे. या कार्यरत शासकीय कंत्राटी कर्मचारी यांनी गेली २० वर्षे केलेल्या सातत्यपूर्ण परिश्रमामुळे या क्षेत्रात महाराष्ट्र राज्य नेहमी अग्रेसर राहिला आहे.

परंतु सध्यस्थिती पाहता सदर कर्मचारी यांचे 4 महिन्यापासून वेतन अदा केलेले नाही.त्यामुळे या कार्यरत कर्मचारी यांचे कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे. राज्य स्तरावर केंद्र शासनाचा निधी उपलब्ध आहे. तरीसुद्धा राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचा नियोजनाचा अभाव असल्यामुळे सदर कर्मचारी यांना विनाकारण फटका सोसावा लागत आहे.

या परिस्थितीमुळे कर्मचारी यांचे दैनदिन खर्च व गरजा भागविणे,कजार्चे हप्ते वेळेवर भरणा करणे, कुटुंबाची उपजीविका चालू ठेवणे अशक्य होत आहे. बँकाचे हप्ते न गेलेमुळे बँकांनी कर्मचारी यांचे सीबील खराब केले आहे. याकरिता सर्व कर्मचारी यांनी विभागाशी संपर्क करून याबाबत विचारणा केली आहे. मात्र अपेक्षुत प्रतिसाद मिळाला नाही. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून वेतन मिळणेसाठी त्यांचे कडून कोणताही प्रतिसाद मिळत नाही.त्यामुळे सदरचे कर्मचारी नैराश्यामध्ये आहेत. सदरचे वेतन अल्पशा असल्यामुळे या उदासीनतेचा परिणाम त्यांचे वैयक्तिक जीवनावर भविष्यात बेतनेची शक्यता आहे.

वेतन अदा करणेबाबत सहानभूतीपुर्वक विचार व्हावा यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन निवेदन देणार आहेत.असेही कार्याध्यक्ष सचिन जाधव यांनी सांगितले.

### विशेष कार्यकारी अधिकारी मोकाशी यांचेशी संपर्क - मिलिंद भोसले

पाणी पुरवठा व स्वच्छती विभागातील १६०० कर्मचारी यांचे वेतन तीन महिने पासून नाही. आज मुख्यमंत्री कार्यालयातील विशेष कार्यकारी अधिकारी सिध्देश्वर मोकाशी यांचेशी संपर्क साधला असता ही बाब मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निदर्शनास आणून देणार असल्याचे मोकाशी यांनी सांगितले.

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

# नांदेड येथे श्री गुरु तेग बहादुर जी ३५० वी शहीदी समागम कार्यक्रम




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** नांदेड येथे हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० वी शहीदी समागम कार्यक्रमाचे आयोजन दि. २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्यक विभागाच्या सहकार्याने तसेच राज्यस्तरीय समन्वय समिती व विविध समाजघटकांच्या सहभागाने हा ऐतिहासिक कार्यक्रम पार पडणार आहे.

### पत्रकार परिषदेत माहिती

सचखंड गुरुद्वारा व राज्यस्तरीय समितीने आयोजित पत्रकार परिषदेत संत ज्ञानी हारनाम सिंघजी, जथेदार भाई कुलवंत सिंघजी, भाई जोतिनदार सिंघजी, भाई कश्मीर सिंघजी, गुरमीत सिंघजी, भाई रामजी सिंघजी, महेंद्र रायचुरा, रामेश्वर नाईक व जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी कार्यक्रमाच्या नियोजनाची सविस्तर माहिती दिली.

### भाविकांची उपस्थिती

- देशभरातून दहा लाखांहून अधिक भाविक या कार्यक्रमाला उपस्थित राहणार असल्याचे मान्यवरांनी सांगितले.
- महाराष्ट्र, पंजाब, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, आंध्र प्रदेश आदी राज्यांतून विशेष रेल्वे गाड्यांची व्यवस्था करण्यात आली आहे.
- भाविकांसाठी निवास, भोजन व प्रवासाची शासकीय स्तरावर मोठ्या प्रमाणात सोय करण्यात आली आहे.

### प्रशासनाची तयारी

- गेल्या महिन्याभरापासून जिल्हा प्रशासन व समितीने तयारी सुरू केली असून ती आता अंतिम टप्प्यात आहे.
- शाळांमधून प्रभात फेऱ्या, निबंध व वकृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.
- आसर्जन येथे उभारण्यात येणाऱ्या भव्य मंडप निर्मितीत जिल्हाधिकारी व प्रशासन एक हजार विद्यार्थ्यांसह श्रमदान करणार आहेत.

### मान्यवरांची उपस्थिती

या कार्यक्रमाला उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, भारताचे गृहमंत्री अमित शहा तसेच अनेक संत, महात्मे, कीर्तनकार व शीख संत उपस्थित राहणार आहेत.

### कार्यक्रमाचे महत्त्व


- दोन दिवसीय या समागमात प्रवचने व कीर्तनाचे आयोजन होणार आहे.
- शीख धर्मीयांसह सर्व धर्माचे अनुयायी मोठ्या संख्येने सहभागी होतील.
- दया, क्षमा, शांती, प्रेम, त्याग व स्वातंत्र्य यांचा संदेश देणाऱ्या श्री गुरु तेग बहादुर जी यांच्या विचारांचा प्रसार घराघरात व्हावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**
**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय
**निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**
-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# पत्रकारांची भूमिका समाजाला दिशा देणारी वास्तव मांडणारी- राजकुमार हिवरकर

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** माणसाला सन्मानपूर्वक जगण्यासाठी पत्रकार आणि त्यांची लेखणी यांची भूमिका कायमच अग्रभागी राहिली आहे. त्यांच्या लेखणीच्या माध्यमातून समाजातील अनेक प्रश्नांची उत्तरे सहज सापडतात त्यामुळे पत्रकाराची भूमिका समाजाला दिशा देणारी वास्तव मांडणारी असल्याचे मत शिवसेना ओबीसीचे जिल्हाप्रमुख राजकुमार हिवरकर पाटील यांनी व्यक्त केले.




ते नातेपुते येथील शिवसेना भवन या ठिकाणी शिवसेना जिल्हा ओबीसी विभाग, राजगड ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था, राजगड नॉलेज सिटी यांच्या वतीने पत्रकार दिनानिमित्त पत्रकाराचा सन्मान सोहळा प्रसंगी बोलत होते. यावेळी राजगडचे व्हाईस चेअरमन शैलेश दोशी, संचालक रोनक चकेश्वरा, दर्शन गांधी, किशोर लोणारी, धनंजय हिवरकर, शंकर शिंगाडे, मॅनेजर तुषार मिटकरी महात्मा फुले दूधडेरीचे चेअरमन रणजीत जठार, भाजपचे एकनाथ ननवरे, नातेपुते शहर प्रमुख पोपटराव शिंदे, प्रभाग ६ चे प्रमुख सनी बरडकर, गटनेते दादाभाई मुल'नी, रणजीत हिवरकर पाटील, प्रभाग १३ चे प्रमुख राजू मुलांनी, भाजपाचे मनोज जाधव, सुनील बनकर आदी मान्यवर उपस्थित होते यावेळी शिंदे गट शिवसेनेचे ओबीसी चे जिल्हाप्रमुख राजकुमार हिवरकर पाटील यांच्या शुभहस्ते उपस्थित सर्व पत्रकारांचे पत्रकार दिनाचे औचित्य साधून पत्रकारांना भेटवस्तू देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी शिवसेनेचे पदाधिकारी तसेच शिवसैनिक, राजगड ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेचे व राजगड नॉलेज सिटीचे सर्व पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## कटूसत्य शब्दकोडे

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | २ | ३ | ■ | ४ | ५ | ६ | | ७ |
| | ■ | ■ | ■ | ८ | | ■ | ९ | | | ■ | |
| १० | | ११ | १२ | ■ | ■ | १३ | | ■ | १४ | १५ | |
| | ■ | १६ | | १७ | ■ | | ■ | १८ | ■ | | ■ |
| १९ | | | ■ | २० | २१ | | ■ | ■ | २२ | ■ | २३ |
| | ■ | ■ | २४ | | | ■ | २५ | | | २६ | |
| २७ | २८ | ■ | २९ | | | ३० | | | ३१ | | ■ |
| ■ | ३२ | ३३ | | ■ | ३४ | | | ३५ | ■ | ■ | ३६ |
| ३७ | | | ■ | ३८ | | ■ | ३९ | | ४० | | |
| ४१ | | ■ | ४२ | | | ■ | ■ | ■ | ४३ | ४४ | |
| | ■ | ४५ | | ■ | ४६ | | ४७ | ४८ | ■ | ४९ | |
| ■ | ५० | | | ५१ | | ■ | ५२ | | | | |

**उभे शब्द :** १) हिंदी सिनेसृष्टीतील महानायक अभिनेता २) नदीचा काठ, बाण ३) अंतराळात प्रवास करणारे वाहन, नया उलट लिहा ४) उजेड ५) साठ मिनिटांचा एक ** ६) वायू, वारा ७) दुप्पट (इंग्रजीत) ११) नोकरच्या विरूध्दार्थी, धनी १२) गन उलट लिहा १३) कर्मचाऱ्यांना मिळणारा पगार १५) एक (इंग्रजीत) १७) फोटो (हिंदीत) २१) दहा (हिंदीत) २२) श्रीरामाचा एक बंधू २३) उद्या (हिंदीत) २४) ढग (हिंदीत) २५) दशमी नंतरचा दिवस २६) दहा (इंग्रजीत) २८) थकीत येणे राहिलेली रक्कम ३०) घोड्याच्या पायाच्या खुराला ठोकतात ती अर्धवर्तुळाकार पट्टी ३३) आदर सत्कार, ** सन्मान ३४) पुण्यातील प्रसिध्द गणपती-***** हलवाई ३५) वाईट सवय ३६) आठवड्यातील एक वार ३७) मालावर भरावा लागणारा कर, टॅक्स ३८) दुधावरील मलई ४०) लहान बाळाला टोचतात ती ४२) दशरथपुत्र ४४) दात ४५) तीन दुणे ४७) शरीर (हिंदीत), दक उलट लिहा ४८) सायकलच्या चाकाच्या या भागावर टायर बसवितात

**आडवे शब्द :** १) गुढीपाडव्यानंतरचा एक सण
४) भवानीमातेचे मंदिर छ. शिवरायांनी या किल्ल्यावर बांधले आहे
८) क्रिकेटमधील धाव (इंग्रजीत) ९) सशाशी शर्यत लावणारा कथेतील प्राणी
१०) हवामानातील उष्मा १३) पोशाख, एक म्हण-जसा देश तसा **
१४) आश्चर्य १६) नजीक, समीप १८) मोफत (इंग्रजीत)
१९) पाण्यावर तरंगणारा एक पक्षी २०) घर, निवास २४) अकरा दुणे
२५) मोबाईल फोनची सेवा पुरविणारी आयडिया प्रमाणे एक कंपनी
२७) स्त्रियांचा नाकातील दागिना २९) वस्तूचे मूल्य, भाव
३०) अनेक रस्ते एकत्र येतात असे मोक्याचे ठिकाण ३१) शरीर, काया
३२) किमानच्या विरूध्दार्थी
३४) पाणीयुक्त चिखल, गाळ ३७) जीभ (हिंदीत) ३८) घर वा फर्निचरकरता या वृक्षाचे लाकूड वापरतात ३९) थंड, गार, मुलीचे एक नाव ४१) काकाची बायको
४२) एक माजी भारतीय फलंदाज-अंबाती *** ४३) वाकडातिकडा नसलेला, स्ट्रेट
४५) मस उलट लिहा ४६) शेकाप पक्षाचे पूर्ण नाव-**** कामगार पक्ष
४९) औषध (हिंदीत) ५०) पाच दुणे ५१) बारा गुणिले पाच
५२) गुजरात जवळील केंद्रशासित प्रदेश-दिव ***

## सुडोकु - 149

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 3 | | | | | 1 | | |
| | | | | | 2 | 3 | | |
| 1 | | | | 5 | | | | 4 |
| 9 | 8 | | 1 | | 5 | | 7 | 2 |
| 2 | 5 | 7 | 9 | | | | 3 | 1 |
| 6 | 1 | 3 | 7 | 2 | 8 | | 4 | |
| 4 | 2 | | 5 | | 1 | | | 3 |
| | 7 | 8 | | | 9 | | | 5 |
| | 6 | | 4 | | | | | |

# पिंपरी-चिंचवडसारखा विकास हवा असेल तर राष्ट्रवादीच पर्याय - सुनील तटकरे




**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** पायाभूत सुविधांचे शहर म्हणून ओळखल्या जार्णाया पिंपरी-चिंचवडचा झपाट्याने झालेला विकास हा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दूरदृष्टीचे फलित आहे. महापालिकेच्या स्थापनेनंतर तेथे नागरिकीकरण व औद्योगीकरण वाढत गेले आणि शहराने वेगळी ओळख निर्माण केली. मात्र, सोलापूरमध्ये असा विकास का झाला नाही, असा सवाल उपस्थित करत आता सोलापूरच्या सर्वांगीण विकासाची वेळ आली असल्याचे सांगून पिंपरी चिंचवडचे विकास मॉडेल सोलापुरात राबविण्यासाठी अजितदादांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला साथ द्या, असे आवाहन राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष, खासदार सुनील तटकरे यांनी केले.

शुक्रवारी, गांधी नगर येथील हेरिटेज येथे महापालिका निवडणुकीतील राष्ट्रवादी काँग्रेस उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित केलेल्या निर्धार मेळाव्यात तटकरे बोलत होते. अध्यक्षस्थानी कृषीमंत्री तथा पक्षाचे संपर्कमंत्री दत्तात्रय भरणे हे होते. यावेळी राष्ट्रवादी महिला प्रदेशाध्यक्षा रुपाली चाकणकर, जिल्हाध्यक्ष उमेश पाटील, माजी उपमहापौर राजेंद्र कलंत्री, प्रा. श्रीनिवास कोंडी, नजीब शेख, प्रमोद भोसले, आनंद मुस्तारे, मकबूल मोहोळकर, वसीम बुऱ्हाण, तौफिक शेख, चंद्रकांत दायमा, सुहास कदम, सुशील बंदपट्टे, चित्रा कदम उपस्थित होते. प्रारंभी शहराध्यक्ष संतोष पवार यांनी प्रास्ताविक तर कार्याध्यक्ष जुबेर बागवान यांनी स्वागत केले. सुरूवातीला राष्ट्रवादीच्यावतीने तयार करण्यात आलेल्या निवडणूक जाहीरनाम्याचे प्रकाशन तटकरे व भरणे यांच्या हस्ते करण्यात आले.

शहरातील बंद पडलेली सिटीबस सेवा व प्रवासी सुविधा पुन्हा सुरू करायच्या असतील तर राष्ट्रवादीच पर्याय असल्याचे सांगून शहरातील रिंग रोडसह अपूर्ण राहिलेली सर्व विकासकामे पूर्णत्वास नेण्यासाठी अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीला साथ द्यावी. राष्ट्रवादीच्या निवडणूक जाहीरनाम्यात शहराच्या विकासाचे नवे मॉडेल मांडण्यात आले असून पुढील पाच वर्षांत त्यातील सर्व मुद्दे पूर्ण करण्याची ग्वाही दिली आहे. विरोधकांच्या कोणत्याही आमिषांना बळी न पडता स्वाभिमान जागृत ठेवून राष्ट्रवादीच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे, असे आवाहन त्यांनी केले.

सरकारमध्ये महायुतीला साथ देण्याचा निर्णय हा केवळ राज्याच्या आणि जनतेच्या विकासासाठीच घेतला असल्याचे स्पष्ट करत त्यांनी सांगितले की, लोकसभेतील संघषानंतर सुरू केलेल्या विविध योजनांमुळे विधानसभेला जनतेचा भरघोस पाठिंबा मिळाला. सोलापूर शहर हे अजितदादांवर प्रेम करणारे असून ते विश्वासार्ह व कार्यकुशल नेतृत्व असल्याचेही तटकरे यांनी नमूद केले.

यावेळी संपर्कमंत्री भरणे व चाकणकर यांनीही मनोगत व्यक्त केले. शेवटी अनेक कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश झाला. या सर्वांचे तटकरे यांनी स्वागत केले. आभार आनंद मुस्तारे यांनी मानले.

# प्रभाग ६ मध्ये कमळाची लाट !

## आ. विजयकुमार देशमुख यांच्या लक्षवेधी सहभागाने नवचैतन्य





**आमदार विजयकुमार देशमुख यांच्या सहभागाने कार्यकर्त्यांमध्ये कमालीची ऊर्जा !**

प्रभाग क्रमांक ६ मधील भाजपचे उमेदवार गणेश वानकर,सुनील खटके,मृण्मयी गवळी व सोनाली गायकवाड यांच्या प्रचाराचा शुभारंभ करताना सोलापूर शहर उत्तर मतदारसंघाचे भाजपचे आमदार विजयकुमार देशमुख यांनी आवर्जून हजेरी लावली होती. तर रविवारी निघालेल्या पदयात्रेमध्ये आवसे वस्ती आमराई येथून आमदार विजयकुमार देशमुख यांनी भाजप उमेदवारांसमवेत सहभाग नोंदविल्यामुळे भाजप कार्यकर्त्यांमध्ये कमालीची ऊर्जा आणि नवचैतन्य निर्माण झाले आहे. आमदार विजयकुमार देशमुख यांच्या मतदारसंघात प्रभाग ६ चे सर्व उमेदवार निवडणुकीला सामोरे जात असल्यामुळे आमदार देशमुख यांच्या सहभागाने कमालीचा उत्साह आला आहे. आमदार विजयकुमार देशमुख यांच्या माध्यमातून या भागात रस्ते, वीज, ड्रेनेज, पाणीपुरवठा आदींची कोट्यवधी रुपयांची विकासकामे झाली असल्यामुळे भाजप उमेदवार मोठ्या मताधिक्याने निवडून येतील,असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्र. ६ मधील भाजप उमेदवारांच्या प्रचारार्थ रविवारी काढण्यात आलेल्या रॅलीमध्ये कमळाची मोठी लाट उसळली होती. भाजपचे पॅनल प्रमुख आणि उमेदवार गणेश वानकर ,सुनील खटके,मृण्मयी गवळी आणि सोनाली गायकवाड या उमेदवारांच्या प्रचारार्थ निघालेल्या पदयात्रेच्या प्रारंभी मरीआई चौकातील गवळी वस्ती कामगार नवरात्र महोत्सव मंडळाच्या शक्तिदेवीची पूजा करून आणि आशीर्वाद घेऊन वाजतगाजत मोठ्या जल्लोषात पदयात्रेला प्रारंभ झाला. भाजपचे सर्व उमेदवार एका उघड्या जीपमध्ये विराजमान झाले होते. जय श्रीराम, जय भवानी जय शिवाजी, भारतीय जनता पार्टीचा विजय असो, पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तुम आज बढो, हम तुम्हारे साथ है च्या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. "काय बोलणार विकास बोलणार" या गगनभेदी घोषणा सर्वांचे लक्ष वेधून घेत होत्या.

या रॅलीमध्ये भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते, गवळी वस्ती, बांध वस्ती, दमाणी नगर, गडदर्शन सोसायटी, सोनी सिटी, सन सिटी, आवसे वस्ती आमराई, क्रांती नगर, वाय चौक, देशमुख पाटील वस्ती, जानकर नगर, शेटे वस्ती, गंगा नगर, लक्ष्मी विष्णू मिल चाळ, थोबडे वस्ती,हब्बू वस्ती,थोबडे मळा, देगाव,कोयना नगर, सर्व तांडे या ठिकाणाहून हजारो मतदार तसेच मित्रपरिवार, लाडक्या बहिणी युवा मतदार मोठ्या संख्येने सहभागी झाला होता. लाडक्या बहिणींची संख्या मोठ्या प्रमाणात होती. गळ्यात भाजपचे व सर्वधर्मीय उपरणे, छातीवर कमळाचा बिल्ला घातलेले भाजपचे सर्व उमेदवार पदयात्रेदरम्यान सर्वांना हात जोडून नमस्कार घालत असलेले चित्र ठिकठिकाणी पहावयास मिळाले. तर कार्यकर्ते आणि लाडक्या बहिणींच्या हातात पक्षाचे झेंडे,डोक्यावर भाजपाची टोपी, हातात बॅनर होते. प्रभागातील सर्व नगरे, वस्त्या, सोसायटी आदी भागांमधून वाजत गाजत पदयात्रा काढण्यात आली. पदयात्रेमध्ये ठीकठिकाणी सर्व उमेदवारांचे औक्षण करण्यात येऊन त्यांना आशीर्वाद व शुभेच्छा देण्यात येत होत्या. अनेकांकडून पुष्पहार घालून तसंच पुष्पगुच्छ देऊन आणि पेढे भरवून उमेदवारांचे स्वागत करण्यात येत होते.

आपण केलेल्या विकास कामाची पावती आपणास सुज्ञ मतदार राजा भरघोस मतदानाच्या रूपाने देईल, तसेच लाडक्या बहिणी आपल्या पाठीशी ठामपणे उभ्या राहतील, असा विश्वास भाजपचे पॅनल प्रमुख गणेश वानकर यांनी यावेळी व्यक्त केला.पदयात्रेला युवकांचा तसेच लाडक्या बहिणींचा उदंड प्रतीसाद मिळाला.

या रॅलीमध्ये पाणीवेस तालीम संघाचे संस्थापक चंद्रकांत वानकर, ज्येष्ठ नेते प्रकाश वानकर, महादेव गवळी, बाळासाहेब घुले, माजी नगरसेविका सुनिता कारंडे, मंगलताई वानकर, औदुंबर जगताप, विजय घुले, किरण वाघमोडे, बालाजी चराटे, दत्तात्रय वानकर, अर्जुन गायकवाड, विजय वानकर, लखन कारंडे, भीमा गायकवाड, विजय जाधव, राजेश गवळी, सुरेश कोळी, शरद निकम, नाम पवार, संतोष कोरे,विठ्ठल वानकर, संजय डोके, संभाजी पांढरे, विष्णू जगताप, संदीप काशीद, संतोष जाधव, सुरज काशीद, शेखर कवठेकर, बंटी गवळी, विक्रम पाटील, गुरु खटके, सुनील कदम यांच्यासह भाजपचे पदाधिकारी तसेच कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# वागदरी श्रमसंस्कार शिबिरात भारुड पोवाडे जलसा लोकगीतांचा कार्यक्रम

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** तालमय तबला, सुरात वाजणारी पेटी, खणखणीत वाजवणारे टाळ आणि दाद देणारे रसिक त्यातून प्रबोधनपर भारुड, पोवाडे, विनोदी जलसे, बहारदार लोकगीते यामुळे श्रमसंस्कार शिबिरातील वातावरण पुरते रसिकमय झाले .

मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष हिवाळी श्रम संस्कार शिबिर सध्या वागदरी येथे सुरू आहे. या शिबिराच्या प्रसंगी ग्रामस्थांचे भारुड, नाट्य, जलसा, पोवाडे या माध्यमातून समाजप्रबोधन करण्यासाठी भारुडकार दिनकर कदम यांचा कार्यक्रम कल्याणशेट्टी महाविद्यालयाच्या




वतीने आयोजित करण्यात आला होता. यावेळी बसवराज शेळके, राजश्री शेळके, बा .ना. चव्हाण, प्रा प्रदीप पाटील, प्रा भीम सोनकांबळे, प्रा सोनाली कटकधोंड, प्रा ओंकार घिवारे उपस्थित होते.

**भारुडकार दिनकर कदम यांनी**

जलसा, गाणी, नृत्य, संवाद, विनोद आणि प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून अंधश्रद्धानिर्मूलन, व्यसनमुक्ती,स्त्री-सक्षमीकरण, स्वच्छता, मतदानाचे महत्त्व असे विषय प्रभावीपणे मांडले करमणूक आणि प्रबोधन यांचा समतोल साधला.सामाजिक अन्याय, जातिभेद, स्त्रियांचे प्रश्न, शिक्षण, गरिबी अशा विषयांवर नाटके सादर केली. कदम व त्यांच्या सहकाऱ्यांनी आधुनिक काळातील सामाजिक विषयांवर पोवाडे सादर करून प्रेक्षकांचे मनोरंजन केले लोकगीतांमधून ग्रामीण जीवन, श्रमसंस्कृती, स्त्रियांचे प्रश्न, सामाजिक भावना व्यक्त केल्या. ही गीते समाजाला एकत्र आणण्याचे कार्य करतात असे शेवटी कदम यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा राजशेखर पवार यांनी केले आभार समर्थ पवार यांनी मानले

# प्रभाग क्रमांक २६ मध्ये भाजप उमेदवारांच्या प्रचारार्थ भव्य फेरी

## माजी आमदार दिलीप माने यांचा जनसंवाद

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर कुमठे परिसरातील प्रभाग क्रमांक २६ मधून भारतीय जनता पार्टीच्या अधिकृत उमेदवारांच्या प्रचारार्थ भव्य प्रचार फेरीचे आयोजन करण्यात आले होते. या प्रचार फेरीस माजी आमदार दिलीप माने यांनी उपस्थित राहून नागरिकांशी थेट संवाद साधत भाजपच्या विकासात्मक राजकारणाची भूमिका मांडली.

**या प्रभागातून भाजपचे अधिकृत उमेदवार म्हणून**

- जाधव संगीता शंकर ( अ - अनुसूचित जाती महिला),
- जमादार दीपक विजय (ब - अनुसूचित जमाती),
- माने जयकुमार ब्रह्मदेव (क - सर्वसाधारण)

हे निवडणुकीच्या रिंगणात उतरले असून, त्यांच्या प्रचारासाठी ही फेरी काढण्यात आली.

प्रचार फेरीदरम्यान नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. घराघरांत जाऊन मतदारांशी संवाद साधण्यात आला. यावेळी माजी आमदार दिलीप




माने यांनी सोलापूर महानगरपालिकेने यापूर्वी विकासाच्या राजकारणाला नेहमीच साथ दिल्याचा उल्लेख करत, प्रभाग क्रमांक २६ च्या सर्वांगीण विकासासाठी भारतीय जनता पार्टीच्या उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन केले.

ते म्हणाले की, 'सोलापूर शहराने नेहमी विकासाला प्राधान्य दिले आहे. रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, मूलभूत सुविधा, नागरिकांच्या समस्या यांचे कायमस्वरूपी समाधान करण्यासाठी सक्षम आणि विकासाभिमुख प्रतिनिधींची गरज आहे. भाजपचे उमेदवार हे प्रभागाचा कायापालट करण्यास कटिबद्ध आहेत.'

प्रचारादरम्यान 'कमळ' या निवडणूक चिन्हासमोरील बटन दाबून भाजपच्या तिन्ही उमेदवारांना प्रचंड मतांनी निवडून देण्याचे आवाहन उपस्थित नागरिकांना करण्यात आले. यावेळी स्थानिक कार्यकर्ते, पदाधिकारी, महिला, युवक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रभाग क्रमांक २६ मधील नागरिकांच्या समस्या समजून घेऊन त्यावर ठोस उपाययोजना करण्याचा निर्धार उमेदवारांनी व्यक्त केला. 'प्रभागाचा सर्वांगीण विकास, पारदर्शक कारभार आणि जनतेशी सतत संपर्क हे आमचे प्रमुख उद्दिष्ट आहे,' असे उमेदवारांनी यावेळी सांगितले.

संपूर्ण प्रचार फेरीदरम्यान भाजप समर्थकांमध्ये उत्साहाचे वातावरण दिसून आले. घोषणा, संवाद आणि विकासाचा संदेश देत ही प्रचार फेरी यशस्वीरीत्या पार पडली.

# संग्रामसिंह मोहिते पाटील मित्र मंडळाच्या लेझीम स्पर्धेचा समारोप



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** संग्रामसिंह मोहिते पाटील मित्र मंडळ व शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ७ ते ९ जानेवारी २०२६ या कालावधी साठी आयोजित केलेल्या वीसाव्या भव्य लेझीम स्पधेर्चा बक्षीस वितरणाने समारोप झाला.

सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांच्या जयंतीनिमित्त विजय चौक, अकलूज येथे सदरच्या स्पर्धा संपन्न झाल्या. बक्षीस वितरण प्रसंगी मंडळाचे मार्गदर्शक जयसिंह मोहिते पाटील, अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील, सौ.ऋतुजादेवी मोहिते पाटील, नूतन नगरसेवक सयाजीराजे मोहिते पाटील, कु.कृष्णप्रिया मोहिते पाटील, दिपकराव खराडे पाटील, सचिव अभिजीत रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे पाटील, विविध संस्थांचे आजी-माजी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्पर्धेच्या अखेरच्या दिवशी शहरी मुली ब गटात- श्री जयसिंह मोहिते पाटील विद्यालय संग्रामनगर यांनी प्रथम , श्री हनुमान विद्यालय लवंग यांनी द्वितीय व कृष्णानंद विद्यामंदिर पाटील वस्ती यांनी तृतीय क्रमांक पटकावला. शहरी मुली अ गटात -महर्षि शंकरराव मोहिते प्रशाला, यशवंतनगर व सदाशिवराव माने विद्यालय अकलूज यांनी विभागून प्रथम क्रमांक पटकावला.तर

जिजामाता कन्या प्रशाला अकलूज यांनी द्वितीय व लक्ष्मीबाई कन्या प्रशाला यशवंतनगर यांनी तृतीय क्रमांक पटकावला.

**मुलांच्या खुल्या गटात-**

शंकरराव मोहिते महाविद्यालय अकलूज व कर्मवीर बाबासाहेब माने-पाटील विद्यार्थी वसतिगृह मोरोची यांनी विभागून प्रथम क्रमांक पटकावला. विजय विद्यार्थी वसतिगृह अकलूज यांनी द्वितीय वऔषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय (पदवी) अकलूज यांनी तृतीय क्रमांक पटकावला. तर उत्कृष्ट प्रशिक्षक म्हणून ईलाही बागवान, उत्कृष्ट हालगी वादक मोहन चव्हाण, उत्कृष्ट घुमके वादक शिवाजी होनमाने, उत्कृष्ट सनई वादक मारुती केंगार,उत्कृष्ट झांज वादक सदाशिव आरडे यांना रोख रक्कम व सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आले.

संजय राऊत यांनी स्वागत केले. किरण सूर्यवंशी,शकील मुलाणी यांनी सुत्रसंचलन केले.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी मंडळाच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

# गुणांच्या सादरीकरणाने उद्दिष्ट गाठता येते- प्रमोद पाटील

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मा.ग्रंथालय संचालक मुंबई व सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघ,सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रंथपालन प्रमाणपत्र परीक्षा 2026 केंद्र सोलापूरच्या वगार्चा शुभारंभ रविवार दिनांक 11 जानेवारी रोजी करण्यात आला. सदर कार्यक्रमास प्रमोद पाटील तांत्रिक सहाय्यक जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय,सोलापूर व संजय ढेरे ग्रंथालय निरीक्षक जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय,सोलापूर संघाचे अध्यक्ष ज्योतीराम गायकवाड, उपाध्यक्ष पांडुरंग सुरवसे ,

कार्यवाह साहेबराव शिंदे, सहकार्यवाह भास्कर कुंभार, मुख्याध्यापक अविनाश गायकवाड, वर्ग व्यवस्थापक कुंडलिक मोरे, शिक्षक दत्ता मोरे ,गणेश फंड,वृषाली हजारे, लिपिक दिपाली नरखेडकर, सेवक गीतांजली गंभीरे, सौ विमल ढेरे



यांच्यासह वगार्चे विद्यार्थी उपस्थित होते आपले अध्यक्षीय भाषणात पाटील यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. त्याचबरोबर उत्साह पूर्ण शैलीने आपल्याजवळ असलेल्या गुणांच्या सादरीकरणाने उद्दिष्ट गाठता येते याची खात्री दिली. मनोरंजनात्मक उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. संजय ढेरे यांनी ग्रंथालय क्षेत्रातील करिअर करण्यासाठी शुभेच्छा दिल्या. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ वृषाली हजारे यांनी केले तर प्रास्ताविक अविनाश गायकवाड यांनी केले. उपस्थित सर्वांनी मनोगत व्यक्त केले. प्रमोद पाटील यांची मराठी भाषा अधिकारी म्हणून नियुक्त केल्याने त्यांचा सत्कार करण्यात आला. ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस आर रंगणाथन यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली तर आभार दत्ता मोरे यांनी मानले. ग्रंथालय चळवळीचे आधारस्तंभ महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे माजी अध्यक्ष, माजी विधान परिषद सदस्य नांदेडचे आमदार गंगाधर पटणे यांच्या निधनाची वार्ता दुःखद वार्ता समजल्याने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली यावेळी वाहण्यात आली.

# आ. देवेंद्र कोठे यांचे गाजले विजय संकल्प सभेतील भाषण

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेच्या निवडणूक प्रचारार्थ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शनिवारी झालेल्या विजय संकल्प सभेत आमदार देवेंद्र कोठे यांनी केलेले भाषण चांगलेच गाजले. विकासाच्या मुद्द्यावर आमदार देवेंद्र कोठे यांनी केलेल्या भाषणाचे सोलापूरकरांनी कौतुक केले. आमदार देवेंद्र कोठे यांनी भाषणादरम्यान केलेल्या विकास कामांच्या मागण्यांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणात त्या मागण्यांच्या पूर्ततेचे संकेत दिले.




**रोज पाणी दिल्याशिवाय फेटा बांधणार नाही**

सोलापूरकरांना दररोज पाणी दिल्याशिवाय फेटा न बांधण्याचा केलेला संकल्प मी गेल्या तीन महिन्यांपासून पाळत आहे. जोपर्यंत सोलापूरकरांना दररोज पाणी देत नाही तोपर्यंत मी फेटा बांधून घेणार नाही, असे आमदार देवेंद्र कोठे यांनी सांगतात सोलापूरकरांनी टाळ्यांचा एकच कडकडाट केला.

आमदार देवेंद्र कोठे यांनी आपल्या भाषणात ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वरांची शपथ घेऊन सांगितले की सोलापूरकरांना दररोज पाणी दिल्याशिवाय मत मागायला येणार नाही. सोलापूरकरांना दररोज पाणी देऊ शकलो नाही तर मी आमदारकीचा त्याग करेन असेही आमदार देवेंद्र कोठे यावेळी म्हणाले. त्यांच्या या विधानाला सोलापूरकरांनी टाळ्या आणि शिट्ट्यांच्या गजरात उचलून धरले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोलापूरच्या सर्वांगीण विकासासाठी दिलेल्या निधीची यादीच आमदार देवेंद्र कोठे यांनी सोलापूरकरांसमोर सादर केली. सोलापूरची विमानसेवा, आयटी पार्क, स्मार्ट सिटी अंतर्गत झालेली इंदिरा गांधी स्टेडियम, स्वातंत्र्यवीर सावरकर जलतरण तलाव, रेल्वे स्थानक येथील विकासकामे तसेच ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर मंदिराशेजारील तलाव परिसरात झालेली कामे सांगताना आमदार देवेंद्र कोठे यांनी या कामांवर टीका करणाऱ्या विरोधकांचाही चांगलाच समाचार घेतला.

सोलापूर महानगरपालिकेची सत्ता मिळवण्याची भाषा करणाऱ्या विवाहिकासत्ता मिळवण्याची भाषा करणाऱ्या महाविकास आघाडीला सर्व १०२ जागांवर उमेदवार देखील उभे करण्यात अपयश आले असे सांगत त्यांनी विरोधकांचे वाभाडे काढले.

आमदार देवेंद्र कोठे यांनी भाषणादरम्यान मांडलेल्या दररोज पाणी पुरवठा, बी टू चा प्रश्न, तिरुपती, बंगळुरू विमानसेवा, आयटी पार्क, हजारो सोलापूरकरांना घरकुल आदी मुद्द्यांवर भाष्य करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या मुद्द्यांच्या अंमलबजावणीची संकेत आपल्या संबोधनात दिले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमदार देवेंद्र कोठे यांचा उल्लेख सोलापूरचे युवा आमदार असे करताच उपस्थित गर्दीमधून झालेला टाळ्यांचा गजर शहर मध्य विधानसभेतून सर्वात मोठ्या संख्येने आलेल्या गर्दी अधोरेखित करत होता.

एकूणच आमदार देवेंद्र कोठे यांनी शनिवारी झालेल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विजय संकल्प सभेत बाजी मारल्याचे दिसून आले.

# राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांच्या अदाकारीचे वागदरीकरांनी केले कौतुक




वागदरी येथील विशेष श्रमसंस्कार शिबिरात नृत्य अदाकारी सादर करताना स्वयंसेविका

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** हिंदी, मराठी व कन्नड भाषेतील सुरेल देशभक्तीची गाणी, भक्ती गीते, बेहतरीन डान्स त्यातून वाद्याचा अविष्कार यामुळे सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये कलाकृतीचा रंग भरला होता. कलाकारांच्या गायन, नृत्य, वादन कार्यक्रमास वागदरीतील रसिकांनी मनमुराद दाद दिली. सांस्कृतिक कार्यक्रमाचे कौतुक देखील केले.

मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष श्रमसंस्कार शिबिर वागदरी येथे सुरू आहे. शिबिराच्या निमित्ताने नागरिकांचे प्रबोधन व्हावे म्हणून स्वयंसेवकांनी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केला होता. प्रारंभी रंगमंच पूजा कमलाकर सोनकांबळे यांचे हस्ते झाले. यावेळी रमेश मंगाणे, परमेश्वर शेळके, शाम बाबर, महादेव सोनकवडे, बापूसाहेब चव्हाण, ज्योती सावंत उपस्थित होते.

स्वयंसेवकांनी कार्यक्रमांमधून लोककला, नृत्य, संगीत, नाटक, काव्यवाचन, भारुड, पोवाडा यांसारख्या विविध कला प्रकारांचे सादरीकरण केले. सांस्कृतिक वारसा नव्या पिढीपर्यंत प्रभावीपणे पोचविण्याचे कार्य देखील केले.

सांस्कृतिक कार्यक्रम हे केवळ मनोरंजनापुरते मर्यादित नसून समाजप्रबोधनाचेही प्रभावी साधन आहे. अनेक वेळा सामाजिक समस्या, स्त्री-पुरुष समानता, पर्यावरण संवर्धन, अंधश्रद्धा निर्मूलन यांसारखे विषय कलात्मक पद्धतीने स्वयंसेवकांनी मांडले . यामुळे

प्रेक्षकांवर सकारात्मक परिणाम झाला, त्यातून विचारप्रवृत्तीला चालना मिळाली. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी असा संस्कृतिक कार्यक्रम उपयुक्त ठरते. आत्मविश्वास, संघभावना, नेतृत्वगुण आणि सर्जनशीलता विकसित करण्यास अशा उपक्रमांची मदत होते. असे यावेळी प्रमुख ग्रामस्थ संयोजक बापूजी चव्हाण यांनी आपल्या भाषणातून सांगितले.

सांस्कृतिक कार्यक्रम समाजाला एकत्र बांधणारे, परंपरा जपणारे आणि नव्या विचारांना प्रोत्साहन देणारे असतात. सामाजिक सलोखा वाढवणे, विविधतेत एकता साधणे हा कार्यक्रमाचा उद्देश असतो असे शेवटी कार्यक्रम अधिकारी प्रा राजशेखर पवार यांनी सांगितले. कार्यक्रमासाठी बहुसंख्य ग्रामस्थ, महिला, बालगोपाळ उपस्थित होते.

सूत्रसंचलन समर्थ पवार यांनी केले उपस्थितांचे आभार कु प्रणाली थोरात यांनी मानले.

# डॉ. मामासाहेब जगदाळे कृषि महाविद्यालय येथे तणाव व्यवस्थापनावर व्याख्यान संपन्न

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे कृषि महाविद्यालय, बार्शी येथे दिनांक ०९ जानेवारी २०२६ रोजी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने तणाव व्यवस्थापन या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी डॉ. संदीप तांबारे हे प्रमुख व्याख्याते म्हणून उपस्थित होते.

डॉ. तांबारे यांनी आपल्या अभ्यासपूर्ण व प्रेरणादायी व्याख्यानातून विद्यार्थ्यांना तणावाची कारणे, त्याचे मानसिक व शारीरिक परिणाम तसेच तणावमुक्त जीवनासाठी आवश्यक उपाय यांची सविस्तर माहिती दिली. सकारात्मक




विचारसरणी, वेळेचे योग्य नियोजन व आत्मविश्वास यांचे महत्त्व त्यांनी प्रभावीपणे स्पष्ट केले. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे कार्यालयीन अधीक्षक मोरे टी. एस., डॉ. रणनवरे ए. वाय ., प्रा. जाधव जी.व्ही., प्रा. शेळके एस. एम., प्रा. आदलिंगे ए. आर. तसेच इतर सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. गुरव एम.डी. यांनी केले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, जनरल सेक्रेटरी पी. टी. पाटील, सहसचिव अरुण देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे तसेच प्राचार्य डॉ. डी. बी. शिंदे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. या व्याख्यानामुळे विद्यार्थ्यांना मानसिक सशक्ततेची दिशा मिळाली, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले.